दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ रविवार, दि. २७ जुलै २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक २५६ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

जिल्हा न्यायालयातील इ लायब्ररीचे उद्घाटन



अमरावती : सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते अमरावती जिल्हा न्यायालयातील इ लायब्ररीचे उद्घाटन आज करण्यात आले. यावेळी न्यायमूर्ती विजय आचलिया, न्यायमूर्ती अनिल किलोर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांच्यासह जिल्हा व सत्र न्यायालयातील न्यायालयीन अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी न्यायालयातील इ लायब्ररी कक्षाचे फीत कापून उद्घाटन केले. त्यानंतर त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग रूमची पाहणी केली. तसेच संगणकावर ई लायब्ररीची पाहणी केली.

वस्त्रोद्योग क्षेत्रामध्ये सौर ऊर्जेच्या वापरासाठी समिती स्थापन करावी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली वस्त्रोद्योग विभागाची आढावा बैठक



वृत्तसंस्था/मुंबई

सामाजिक न्याय, आदिवासी विकास आणि इतर बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या नवीन सहकारी सूतगिरण्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत एकसमान निकष ठरवावे. या विभागांतर्गत असणाऱ्या सूतगिरण्यांसाठी त्या त्या विभागाने अतिरिक्त तरतूद करून द्यावी. तसेच वस्त्रोद्योग क्षेत्रामध्ये सौर ऊर्जेच्या वापरामध्ये येत असलेल्या अडचणी सोडवण्यासाठी वस्त्रोद्योग आणि ऊर्जा विभागाची समिती स्थापन करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वस्त्रोद्योग विभागाची आढावा बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, विधान परिषदेचे आमदार अमरीश पटेल, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अंशु सिन्हा, वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने, रेशीम संचालनालयाचे संचालक विनय मुन, उपसचिव श्री.पवार, उपसचिव श्रीमती कोचरेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सहकारी सूतगिरण्यांना प्रति चाती रुपये पाच हजार प्रमाणे द्यावयाच्या कर्जावरील व्याज अनुदान योजनेस मुदतवाढ देताना यामध्ये आधुनिकीकरण आणि श्रेणीकरण करण्यात यावी. राज्यामधील राष्ट्रीय वस्त्र महामंडळाच्या अंतर्गत बंद असलेल्या मिल पुन्हा सुरू करण्याबाबत अहवाल तयार करावा. त्या आधारे बंद मिल पुन्हा सुरू करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

एकात्मिक वशाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात याव्यात. याचबरोबर सहकारी सूतगिरण्या व सहकारी यंत्रमाग संस्थाकडील शासकीय देणी वसुलीबाबत धोरण तयार करण्यात यावे. याचबरोबर राज्यातील सर्व यंत्रमागाच्या नोंदी करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. पुणे येथील रेशीम संचालनालयाच्या वापरात असलेली इमारत दुरुस्ती व इतर सोयी सुविधा निर्माण करण्याकरिता महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची कार्यवाही तत्काळ पूर्ण करावी, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

नवीन महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळ निर्माण करणे, वस्त्रोद्योग आयुक्तालय आणि रेशीम संचालनालयाचे विलीनीकरण करून वस्त्रोद्योग व रेशीम आयुक्तालयाची निर्मिती करणे, सहकारी सूतगिरण्यांकडील अतिरिक्त जमीन विक्रीस परवानगी देण्याबाबतची योजना, सूतगिरण्यांना पुनर्वसन कर्ज देण्यासाठी नवीन योजना तसेच सूतगिरण्या भाडेपट्टीवर देण्यासाठी योजना तयार करणे, सहकारी सूतगिरणी यांची प्रकल्प अहवाल किंमत रुपये ८०.९० कोटी वरून रुपये ११८ कोटी इतकी सुधारित करण्याबाबतची कार्यवाही करणे, सातारा जिल्ह्यातील वाई येथील रेड क्रॉस सोसायटी यांच्याकडील लिजवरील जागा जिल्हा रेशीम कार्यालयाकरिता कायमस्वरूपी घेणे आदी महत्त्वपूर्ण विषयांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

बाधित शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे : मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील

अवकाळीमुळे बाधित झालेल्या ३ लाख ९८ हजार शेतकऱ्यांना मदतीपोटी ३३७ कोटी ४१ लाखाच्या निधीस मान्यता

वृत्तसंस्था/मुंबई

अवकाळी पाऊस व गारपीटमुळे राज्यात फेब्रुवारी २०२५ ते मे २०२५ या कालावधीत ३ लाख ९८ हजार ६०३ बाधित शेतकऱ्यांच्या १ लाख ८७ हजार ५३.२१ हेक्टर क्षेत्रातील शेत पिकांच्या नुकसानीपोटी राज्य शासनाने ३३७ कोटी ४१ लाख ५३ हजार इतक्या निधीस मान्यता दिली आहे. या बाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

फेब्रुवारी २०२५ ते मे २०२५ या कालावधीत अवकाळी पाऊस व गारपीटमुळे झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी छत्रपती संभाजीनगर विभागामधील ६७ हजार ४६२ शेतकऱ्यांच्या ३४ हजार ५४२.४६ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ५९ कोटी ९८ लाख २० हजार, पुणे विभागातील १ लाख ७ हजार ४६३ शेतकऱ्यांच्या ४५ हजार १२८.८८ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ८१ कोटी २७ लाख २७ हजार,नाशिक विभागातील १ लाख ५ हजार १४७ शेतकऱ्यांच्या ४५ हजार ९३५.१६ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ८५ कोटी ६७ लाख ८ हजार, कोकण विभागातील १३ हजार ६०८



शेतकऱ्यांच्या ४ हजार ४७३.६९ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ९ कोटी ३८ लाख २४ हजार, अमरावती विभागातील ५४ हजार ७२९ शेतकऱ्यांच्या ३६ हजार १८९.८६ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ६६ कोटी १९ लाख ११ हजार आणि नागपूर विभागातील ५० हजार १९४ शेतकऱ्यांच्या २० हजार ७८३.१६ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ३४ कोटी ९१ लाख ६३ हजार रुपये मदतीचा समावेश आहे.

बाधित शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे - मंत्री मकरंद जाधव-पाटील

राज्यातील अनेक जिल्ह्यात फेब्रुवारी ते मे २०२५ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले होते. अवकाळी पावसामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असून या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी या निधीस तातडीने मान्यता दिली असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी या उद्देशाने जिल्हा प्रशासनामार्फत बाधित पिकांचे तातडीने पंचनामे करण्यात येऊन शेतकऱ्यांच्या मदतीसाठी हा निधी मंजूर करण्यात आल्याने बाधित शेतकऱ्यांकडून याबाबत समाधान व्यक्त होत आहे, असेही मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

मुंबई - पुणे एक्सप्रेसवे वरील वाहतूक सुरळीत सुरू महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची माहिती

वृत्तसंस्था/मुंबई



यशवंतराव चव्हाण मुंबई पुणे एक्सप्रेस मार्गावरील मुंबईकडे येणाऱ्या लेनमध्ये मातीचा मलबा ढासळल्याने दि. २५ रोजी सायंकाळी काही काळ वाहतूक बंद झाली होती. याबाबत तात्काळ कार्यवाही करून महामार्गावरील या दोन्ही लेनमधील वरील वाहतूक पूर्ववत सुरळीत सुरू आहे असे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

एक्सप्रेस वे वर ४५/३०० किमी अंतरावर सायंकाळी सहा वाजून दहा मिनिटांनी मुंबईकडे येणाऱ्या लेनमध्ये रस्त्यावर झाडाच्या फांद्या व काही मातीचा मलबा ढासळला होता. काही काळ वाहतूक बंद झाल्याने त्याबाबत माध्यमातून वृत्त आले होते. एमपीईडब्ल्यू पॉईंट येथे तैनात असलेल्या पथकाने जेसीबी व यंत्रणेच्या सहाय्याने पावणे सात वाजता ते पूर्णपणे दूर करण्यात आले. महामार्गावरील या दोन्ही लेनमधील वरील वाहतूक पूर्ववत सुरळीत सुरू करण्यात आली.

तोपर्यंत एक लेन मोकळी करण्यात आली. त्यानंतर १८:४४ वाजता सर्व लेन मोकळी करण्यात आल्या आणि १८:४५ पर्यंत वाहतूक पूर्णपणे मोकळी झाली. एक्सप्रेसवेची वाहतूक स्थिती सामान्य आहे आणि सर्व लेनमधील सर्व वाहनांसाठी खुली आहे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

लोकाभिमुख शासनाच्या भूमिकेत महसूल अधिकाऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

अहिल्यानगर जिल्ह्यातील कामांचा महसूल मंत्री बावनकुळे यांनी घेतला आढावा

वृत्तसंस्था/मुंबई

शासनाचे काम गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होण्यासाठी महसूल विभागातील अधिकाऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. यासाठी तलाठी, तहसीलदार, मंडळ अधिकारी यांनी जनसंवाद, लोकशाही दिन, लोकअदालत आदी माध्यमातून आणि विशेष शिबिरे आयोजित करुन नागरिकांपर्यंत पोहोचावे आणि त्यांच्या अडचणी सोडवाव्यात, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील महसूल विभागाशी संबंधित कामांचा आढावा मंत्री श्री. बावनकुळे यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेतला. यावेळी मंत्रालयातील



अधिकाऱ्यांसह अहिल्यानगर जिल्ह्यातील महसूल अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मंत्री श्री.बावनकुळे म्हणाले, राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कृती कार्यक्रमाअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेत ३० लाख घरांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करुन लाभार्थ्यांना पट्टे वाटप करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. घरकुलांना वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी ३० एप्रिल रोजीच्या मार्गदर्शक सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. भूमि अभिलेख विभागाच्या आधुनिकीकरणासाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करुन घ्यावा. पाणंद, शिवपाणंद रस्ते १२ फुटांचे करुन त्यांना क्रमांक द्यावेत तसेच दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात यावी. अर्धन्यायिक प्रकरणांच्या सुनावण्यांसाठी लोकअदालतीसारखे उपक्रम राबवून सर्व सुनावण्या येत्या तीन महिन्यात पूर्ण कराव्यात, असे त्यांनी सांगितले.

जिवंत सातबाराअंतर्गत नोंदी अद्ययावत करणे, तुकडेबंदी, शेतरस्ता, भोगवटादार २ मधून १ मध्ये करण्याची तसेच आकारी पड जमिनीची प्रकरणे, स्वामित्व योजनेचा लाभ देणे आदी कामे विषयानुसार शिबिरांचे आयोजन करुन कालबद्धरितीने मार्गी लावावीत, असे निर्देश महसूलमंत्री श्री.बावनकुळे यांनी दिले. जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या गौण खनिजांचे ड्रोनच्या माध्यमातून सर्वेक्षण करावे असे सांगून ज्यांनी अवैध उत्खनन केले असेल त्यांच्याविरोधात महसूल आणि पोलीस विभागामार्फत कारवाई करण्याचे आदेश मंत्री श्री.बावनकुळे यांनी दिले. शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ सुलभतेने मिळावा यादृष्टीने ?ग्रीस्टॅक मध्ये नोंदणी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्यासह जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांनी यावेळी सुरू असलेल्या विविध कामांचा अहवाल सादर केला.

जल जीवन मिशन अंतर्गत योजनांची प्रलंबित कामे येत्या १५ दिवसात पूर्ण करा : महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर जिल्ह्यातील जलजीवन मिशनचा घेतला आढावा





वृत्तसंस्था/नागपूर

जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत योजनांची प्रलंबित कामे १० ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज अधिकाऱ्यांना दिले. जल जीवन अंतर्गत १३०२ योजनांची सर्व कामे गुणवत्तापूर्णरित्या करावीत असेही त्यांनी सांगितले.

नियोजन भवन येथे पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर जिल्ह्यातील जल जीवन मिशनच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या. याप्रसंगी वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार विकास ठाकरे आणि संजय मेश्राम, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे आदी उपस्थित होते.

जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात सुरु असलेल्या विविध योजनांची माहिती श्री. बावनकुळे यांनी यावेळी जाणून घेतली. या मिशन अंतर्गत येणाऱ्या योजना व यातील अपूर्ण योजनांच्या खर्चाचा नव्याने आराखडा तयार करावा, निधी प्राप्त झाल्यावर पुन्हा खर्चाचा आराखडा तयार करुन निविदा काढाव्यात. एका कंत्राटदाराला दोन पेक्षा जास्त कामे देण्यात येऊ नये आदी सूचना करुन ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्यांनी येत्या १५ दिवसात प्रलंबित सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

जलजीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यातील एकुण १३ तालुक्यात समाविष्ट १३०२ योजना व यातील योजनांची पूर्ण झालेली कामे, प्रगतीपथावर असलेल्या योजना तसेच ग्रामपंचायतींकडे हंस्तातरित करण्यात आलेल्या योजना, प्रलंबित असलेली नळ जोडणीची कामे आणि केंद्र व राज्य शासनाकडून जलजीवन मिशन अंतर्गत करावयाच्या कामांसाठी आवश्यक निधी आदींबाबत जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक धोंगे यांनी सादरीकरण केले.

जिल्ह्यातील पाणी टंचाई कृती आराखडयातील आतापर्यंत हाती घेण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती श्री. बावनकुळे यांनी यावेळी जाणून घेतली. ज्या गावांमध्ये पाण्यांचे स्त्रोत कोरडे झाले आहेत तिथे बंधारा बांधून पाणी अडवणे, जल पुनर्भरणाची कामे हाती घेणे व अशा गावांमध्ये १५ लाखांच्या मर्यादेतील कामे तातडीने करण्याचे निर्देशही श्री. बावनकुळे यांनी यावेळी दिले. महावितरण कंपनीकडून पाणी पुरवठा योजनांसाठी आवश्यक वीज जोडणीच्या प्रलंबित प्रकरणांचा आढावाही यावेळी घेण्यात आला. महावितरणकडून शहरी आणि ग्रामीण भागात उभारावयाची अतिरिक्त रोहित्रे, वीज वितरणाबाबत करावयाचे व्यवस्थापन आदींविषयी श्री. बावनकुळे यांनी यावेळी यंत्रणांना सूचना केल्या. तसेच गावोगावांमध्ये जाऊन जनतेशी संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी नियोजन करुन त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देशही त्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले.

विजय दिनाचा मुख्य उद्देश भारताचा गौरवशाली इतिहास मुलांना कळावा हाच आहे : मंगलप्रभात लोढा

वृत्तसंस्था/पुणे

भारताचा इतिहास हा गौरवशाली इतिहास आहे. जो पर्यंत मुलांना भारताचा गौरवशाली इतिहास समजणार नाही तो पर्यंत त्यांच्या मनात जोश निर्माण होणार नाही. आय टी आय मध्ये प्रथमच विजय दिवस साजरा केला जात असून,भारताचा गौरवशाली इतिहास मुलांना समजावा हाच विजय दिनाचा मुख्य उद्देश आहे, असे प्रतिपादन राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

लोणावळा येथील क्रांतीकारक लहुजी साळवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विजय दिवस या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात



आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी लोणावळा क्रांतिकारक लहुजी साळवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य प्रतिभा चव्हाण, पुणे प्रादेशिक कार्यालयाचे सहसंचालक चंद्रशेखर ढेकणे आदी उपस्थित होते.

श्री.लोढा पुढे म्हणाले, इस्त्राईल लहान देश आहे पण प्रत्येक नागरिकामध्ये देशप्रेमाची भावना असल्यामुळे देश लहान असला तरी तो लढतो व जिंकतो आहे. देशासाठी लढणाऱ्यांच्या इतिहास बाबतची माहिती जागोजागी प्रदर्शित केली पाहिजे. लोणावळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये १४ विविध प्रकारचे कोर्सेस सुरु असून,अजून छोटे कोर्सेस सुरू करण्याचा विचार आहे. विद्यार्थ्यांना बोलते करा त्यांच्यामधील आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही तसेच कुशल प्रशिक्षकांकडून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाईल. लोणावळा येथे पर्यटनासाठी मोठ्या संख्येने लोक येत असतात, त्यामुळे मुलांनी हॉस्पिटॅलिटी व्यवसायात पुढे येणे गरजेचे आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

माजी सैनिक महेश थत्ते म्हणाले, कारगिलच्या लढाईने देशाने नेहमी युद्धासाठी सज्ज राहावे असा संदेश दिला. या युद्धामुळे भारताची प्रगल्भता वाढली आहे आणि भारताला एक चांगला युद्धाचा अनुभव मिळाला आहे . यावेळी त्यांनी कारगिल युद्धाच्या आठवणींना उजाळा दिला आहे.लेखिका व साहित्यिक मंजुश्री मंगल प्रभात लोढा यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांना आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटनिदेशक श्री पासलकर यांनी केले तर आभार प्रदर्शन कुमारी श्रेया चामरे यांनी केले. याप्रसंगी लोणावळा परिसरातील माजी सैनिकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला क्रांतीकारक लहुजी साळवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे निदेशक,कर्मचारी, विद्यार्थी व माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादकीय...

धडधड धनखड!...

पण आता जे झाले त्याने मूळ-भाजपवासीयांस आनंदाच्या उकळ्या फुटत असतील. कारण धनखड हे रक्ताने भाजपीय नव्हते. तसे ते असते तर अशी स्वतंत्र विचाराची इच्छाच त्यांच्या मनी उद्भवली नसती. पश्चिम बंगालसारख्या राज्यात स्वतःस 'सिद्ध' केल्यानंतर पदोन्नती मिळून धनखड यांची थेट उपराष्ट्रपतीपदी प्रतिष्ठापना झाली होती. भाजपने उपकृत केलेल्या एखाद्या व्यक्तीने जरा जरी स्वतःची स्वतंत्र बुद्धी वापरण्याचा प्रयत्न केला की काय होते हे सत्य पुन्हा एकदा उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या राजीनाम्याने अधोरेखित होते. धनखड यांच्या आकस्मिक राजीनाम्याचे स्वागत करावे की त्याबद्दल खेद व्यक्त करावा हे विरोधी पक्षीयांना कळले नाही आणि 'वरून' आदेश नसल्याने भाजपवासीयांना उमगले नाही. विरोधी पक्षीयांना धनखड यांच्याविषयी ममत्व वाटावे असे त्यांचे कधी वर्तन नव्हते ना विचार! उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. अशा पदांवरील व्यक्तीने तटस्थ, पक्षनिरपेक्ष असावे अशी घटनाकारांची अपेक्षा असते. लोकसभा, राज्यसभा, सर्व राज्यांच्या विधानसभा, राज्यपाल, राष्ट्रपती आदींनी ही अपेक्षा धुळीस मिळवली त्यास कित्येक दशके उलटली. हे सर्व महामहीम सत्ताधीशांच्या ताटाखालचे मांजर होण्यात धन्यता मानतात. धनखड हे अशांच्याच मालिकेतील. वास्तविक हा मार्ग पत्करणाऱ्यांचा प्रवास सुखाचा होतो आणि गंतव्य स्थानी पोहोचल्यानंतरही सर्व बडदास्त चोख राखली जाते. धनखड यांचेही मार्गक्रमण या सुखाच्या दिशेनेच सुरू होते. धनखड यांस शासकीय इतमामाचा भलताच शौक. देशात असोत वा परदेशात. आपली व्यवस्था उंची हॉटेलांतील अतिश्रीमंत कक्षात व्हावी, प्रवासासाठी खासगी विमान असावे, आगतस्वागत आणि दिमतीस सरकारी अधिकारी हजर राहावेत असा त्यांचा कटाक्ष असे आणि तो पाळला जाण्यात जरा जरी हयगय झाली की हे महामहीम आगपाखड करण्यास कमी करत नसत. त्यांच्याकडून सत्ताधाऱ्यांस जे हवे ते केले जाण्याची हमी असल्याने त्यांचे हे चोचले आनंदाने पुरवले जात. तरीही त्यांच्यावर राजीनामा देण्याची वेळ आली. हा राजीनामा ही धनखड यांच्यापेक्षा भाजपची अपरिहार्यता होती. कारण उपराष्ट्रपतींनी केलेला अक्षम्य गुन्हा. सत्ताधारी भाजप सर्व प्रमाद, आरोपांकडे काणाडोळा करू शकतो. हे आरोप भ्रष्टाचाराचे असोत वा अन्य त्याहूनही गंभीर. या आरोपांच्या ओझ्याखाली दबलेले अनेक भाजपवासी झाले आणि मग लगेच त्यांना आरोपमुक्ती मिळाली. धनखड यांचेही तसे बरेच सुरू होते. पण त्यांना स्वतःची बुद्धी वापरण्याची अवदसा आठवली आणि त्यांच्या सगळ्या 'पुण्याई'वर पाणी ओतले गेले. वास्तविक धनखड यांची पश्चिम बंगालातील राज्यपालपदाची कारकीर्द किती देदीप्यमान! पश्चिम बंगालात लोकनियुक्त मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या मार्गात अडथळे उभे करण्याची एकही संधी त्या राज्याचे महामहीम असताना धनखड यांनी सोडली नाही. ममताबाईंना त्यांच्या उभ्या आयुष्यात अन्य कोणी इतके जेरीस कधी आणले नसणार. त्यातून महाराष्ट्राचे माजी महामहीम भगतसिंग कोश्यारी, तमिळनाडूचे विद्यामान महामहीम ए. रवी अशा अनेकांस प्रेरणा मिळाली. भाजपविरोधी राज्यातील अनेक महामहिमांनी धनखड यांचा आदर्श ठेवला आणि आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी तो मार्ग चोखाळला. भाजपसाठी अत्यंत महत्त्वाच्या, न्यायिक, राजभवनी साहाय्यानंतरही अभेद्या राहिलेल्या पश्चिम बंगालसारख्या राज्यात स्वतःस सिद्ध केल्यानंतर धनखड यांस पदोन्नती न मिळती तरच नवल. ती मिळाली आणि देशाचे दुसऱ्या क्रमांकाचे नागरिक म्हणून थेट उपराष्ट्रपती भवनात त्यांची प्रतिष्ठापना झाली. 'ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी', या उक्तीचे जाज्वल्य अनुयायी असलेल्या धनखड यांचे त्यानंतरचे वर्तन सत्तापक्षाचे अनुयायी असल्यासारखे होते, यात आश्चर्य ते काय! त्यामुळेच वैफल्यग्रस्त विरोधकांनी त्यांच्याविरोधात अविश्वास ठराव मांडला. पण सत्ताधीशांचा भरभरून विश्वास असताना विरोधकांच्या अविश्वासास विचारतो कोण? धनखड यांनी तसे विचारले नाहीच. पण खाविंदांस इतके वाहिलेले असूनही त्यांच्यावर ही राजीनाम्याची वेळ आली. कारण वर उल्लेखलेला त्यांचा तो प्रमाद. इंदिरा गांधींच्या उत्तरकालीन काँग्रेसप्रमाणे विद्यामान भाजपतही स्वतंत्र बुद्धी चालवणे या गुन्ह्यास क्षमा नाही. सत्ताधारी हवे ते चोचले पुरवतील, गंभीरातील गंभीर प्रमाद पोटात घालतील; पण आपले डोके चालवण्याचा प्रयत्न काय; पण विचार जरी कोणी केला तरी त्याच्या हाती लगेच श्रीफल देऊन 'आता या' असे म्हणतील. धनखड यांस आता याची प्रचीती आली असेल. त्याच वेळी जे झाले त्याने मूल-भाजपवासीयांस आनंदाच्या उकळ्या फुटत असतील. याचे कारण धनखड हे रक्ताने भाजपीय नव्हते. तसे ते असते तर अशी स्वतंत्र विचाराची इच्छाच त्यांच्या मनी उद्भवली नसती. धनखड यांचे कुल समाजवादी. त्यांनी काही काळ जनता दलात घालवला आणि नंतर काँग्रेसचीही साथ केली. म्हणजे भाजपसाठी ते संस्काराने तसे बाहेरचेच. पण विद्यामान सत्ताधीशांस 'बाहेर'च्यांना 'आत' घेऊन आपलेसे करण्यात वा घरचे वाट पाहात असताना बाहेरच्यांचे कौतुक करण्यात बरेच स्वारस्य. म्हणजे संघ आणि भाजपतील अनेक प्रतीक्षा यादीत असताना, सावरकरांबाबत चर्चा होत असताना प्रणब मुखर्जी, चौधरी चरणसिंग वा कर्पूरी ठाकूर आदींस 'भारतरत्न'ने सन्मानित करणे इत्यादी. धनखड यांस उपराष्ट्रपतीपदी बसवण्याचा निर्णय याच मालिकेतील. असाच दुसरा प्रयत्न म्हणजे सत्यपाल मलिक यांस दिलेले जम्मू-काश्मीरचे राज्यपालपद. धनखड यांच्याप्रमाणे मलिक हेदेखील समाजवाद्यांच्या कळपातील. यातील मलिक यांस तर 'अर्बन नक्षल'ही ठरवता येईल, इतकी त्यांची पात्रता. तरीही त्यांना भाजपने जवळ केले आणि त्यांच्याच काळात 'जम्मू-काश्मीर'ला 'अनुच्छेद ३७०' मुक्त करण्याचे स्वप्न पूर्ण केले. पण पुढे मलिक 'आपले' राहिले नाहीत. भले त्यांना नंतर गोव्यासारख्या राज्यात पाठवले गेले! पण तरीही मलिक यांचे शेपूट भाजप नेतृत्वास सरळ करता आले नाही ते नाहीच. या दोहोंत आणखी एक साम्य आहे. ते म्हणजे हे दोघेही जाट. भाजपने त्यांना जवळ करताना ते आपल्याशी जुळवून घेऊ शकतील किंवा काय यापेक्षा त्यांच्या जाट असण्यास अधिक महत्त्व दिले होते. राजस्थान, हरयाणा आणि अन्य उत्तर भारतातील जाट हे भाजपसाठी आव्हान आहेत. त्यातील एखाद्यास जवळ केले की जाट शांत होतील, असा त्या पक्षाचा होरा असणार. त्यातून मलिक आणि धनखड यांस भगवे वस्त्रविलेपित करण्याचा प्रयत्न भाजपने केला. या दोघांनी भाजपची भगवी उपरणी खांद्यावर घेतली खरी. पण तात्पुरतीच. नंतर त्यांनी ती झटकून आपल्या मूळ स्वभावाचे दर्शन घडवले आणि स्वतंत्र विचार करण्याचा प्रयत्न केला. तो उभयतांच्या अंगाशी आला. विचार न करणे राजभवनी सुखासीन आयुष्याची हमी देते आणि विचार करण्याची किंमत मोजावी लागते. ती या दोहोंस द्यावी लागली. याउप्पर प्रश्न असा की मलिक यांच्याप्रमाणे धनखड हेदेखील आपले मन मोकळे करू लागणार का? मलिक हे पुढे भाजपचे कडवे टीकाकार बनले आणि बाकी कोणी नाही तरी त्यांनी संघातून प्रतिनियुक्तीवर भाजपत गेलेल्या राम माधव यांच्या अब्रूस हात घातला. धनखड यांस तसे काही करावयाची गरज नाही. आपणास राजीनामा देण्याचा 'आदेश' कोणाकडून आणि का आला असावा यावर जरी त्यांनी भाष्य केले तरी पुरे. धनखड हे मलिक यांच्यापेक्षा अधिक तडफदार आहेत. शिवाय वकिली केलेली असल्यामुळे त्यांना अशा भाष्याचा अनुभवदेखील अधिक आहे. सर्वोच्च न्यायालयाविषयी, घटनेविषयी त्यांनी अनेकदा केलेले भाष्य त्यांच्यातील तडफदारपणा दाखवून देते. त्याचप्रमाणे त्यांनी उपराष्ट्रपतीपदावरून मुक्त झाल्यावर आपल्या मुक्तीविषयी बोलून असा तडफदारपणा दाखवावा. तसे केल्यास धनखड ही भाजपची नवी धडधड ठरू शकतील. ती त्यांनी ओढवून घेतलेली आहे.

सीआरपीएफमध्ये २४६ इतक्या बटालियन!

(२७ जुलैः भारताचे केंद्रीय राखीव पोलीस दल- सीआरपीएफ स्थापना दिन)



केंद्रीय राखीव पोलीस दल- सीआरपीएफ हे भारतीय पोलीस संस्थेचे एक घटक आहे. हे संघटन भारत सरकारच्या गृहमंत्रालयच्या आदेशानुसार काम करते. यामध्ये काही महत्वाचे कार्य म्हणजे दंगलीच्या ठिकाणी नियंत्रण ठेवणे, काऊंटर मिलिटरी, बंडखोरी, ऑपरेशन, जमाव नियंत्रण, वामपंथी अतिरेक्यांना सामोरे जाणे, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी बचाव आणि मदत कार्य करणे, यास्तव केंद्रीय राखीव पोलीस दलाची स्थापना दि. २७ जुलै १९३९ला करण्यात आली. ज्ञानवर्धक माहितीकरिता श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदरलेख अभ्यासा... संपादक.



संकलन व सुलेखन - श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी. रामनगर वॉर्ड, गडचिरोली. फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

केंद्रीय राखीव पोलीस दल- सेंट्रल रिझर्व्ह पुलिस फोर्स- सीआरपीएफ हे भारतातील सुरक्षा दलांपैकी एक सर्वांत मोठे केंद्रीय दल आहे आणि भारतीय पोलीस सेवेतील हे फोर्स एक बहुउद्देशीय असून अनेक क्षेत्रांतील सुरक्षा करते. सीआरपीएफ भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या (एमएचए) अधिकारात कार्यरत आहे, सीआरपीएफची स्थापना २७ जुलै १९३९ साली झाली आणि यांचा उद्देश अनेक सुरक्षेच्या कार्यात आंतरिक सुरक्षा प्रदान करणे, सीमावर्ती सुरक्षा आणि आणीबाणीच्या परिस्थितीत सुरक्षा, मदत देणे हा होता तसेच सीआरपीएफ विभिन्न क्षेत्रात तैनात करण्यात आली आहे जसे जम्मू आणि काश्मीर, छत्तीसगढ, प्रभावित क्षेत्र तसेच इतर भारत देशातील राज्यांत देखील ही सुरक्षा देण्यात आली आहे. सीआरपीएफचे बोधवाक्य 'सेवा आणि निष्ठा' आहे, भारत देशाच्या स्वातंत्र्यानंतर दि. २ डिसेंबर १९४९ला कायदा लागू करण्यासाठी केंद्रीय राखीव पोलीस दल- सीआरपीएफ बनले आणि निवडणूक काळात देखील सार्वत्रिक निवडणुकांमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलाने खूप मोठ्या प्रमाणात सुरक्षेचे कार्य निभावले.

भारत देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीआरपीएफचे महत्व मोठे आहे, हे फोर्स एक विशेष सशस्त्र दल आहे जे विविध भागात सुरक्षा आणि शांतता राखण्यात महत्वाची भूमिका बजावते. सीआरपीएफ हे सीमा सुरक्षा, अंतर्गत सुरक्षा, व्यावसायिक घटनांचा तपास आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित कार्यवाहीसाठी आहे. सन १९९९च्या साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये देखील लाभलेली मोठ्या प्रमाणात सुरक्षितता बघून आपण या फोर्सचे महत्व समजू शकतो. सीआरपीएफच्या एकूण २४६ इतक्या बटालियन आहेत आणि सीआरपीएफ हे भारत देशातील सर्वांत मोठे अर्धसैनिक दल आहे. जर आपण याचा इतिहास बघितला तर मध्य प्रदेश राज्यात निमच मध्ये दोन बटालियनद्वारे स्थापना झालेली होती. सीआरपीएफचा जर आपण इतिहास बघितला तर या फोर्सचा पूर्वीपासूनच मुख्य उद्देश हा होता कि भारत देशातील संवेदनशील राज्यांत असलेले ब्रिटिश रहिवासी यांचे संरक्षण करणे होता. ही पूर्वीपासूनच त्याची प्राथमिकता होती, म्हणून सीआरपीएफ नक्कीच या उद्देशांमुळे संरक्षण अंतर्गत आहे, असे म्हणता येईल. सीआयएसएफ हे एक केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल आहे आणि हे एक केंद्रीय सशस्त्र दल देखील आहे, जर या फोर्सशी तुलनात्मक विचार केला तर हे सीआयएसएफ औदयोगिक क्षेत्रात- खदानी, विमानतळ, मेट्रो स्टेशन, अणुऊर्जा प्रकल्प आणि इतर महत्वाचे सरकारी तसेच खाजगी क्षेत्रांतील सुरक्षा आणि सुविधा देण्याचे काम करते आणि सीआरपीएफचा जर विचार केला तर हे भारत देशातील सर्वांत मोठे केंद्रीय सशस्त्र दलांपैकी एक आहे. या फोर्स कडे- अंतर्गत सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्था राखणे, इतर अंतर्गत कारवाया करणे, आपत्तीच्या ठिकाणी तात्काळ सुरक्षा पुरविणे इत्यादी. दोन्हीही फोर्स कामानुसार विभाजित झालेले आहेत आणि दोन्हींनी फोर्स आपापल्या जागी स्वतःची वेगळी ओळख देऊन आहेत, म्हणून दोन्हीही फोर्सला आपल्या आवडीनुसार आपण प्राधान्य देऊन त्यांची कामे बघून आवड निवडू शकतो. सीआरपीएफ किंवा बीएसएफ कोणते सर्वोत्तम आहे? तर सीआरपीएफच्या कार्याचा विचार आपण मागे केलाच आहे, तर बीएसएफ- सीमा सुरक्षा दल हे भारत देशातील सीमांचे संरक्षण करणारे दल आहे आणि सीमांना संरक्षण देणे, त्याचे प्राथमिक कर्तव्य आहे तसेच- भारत देशाच्या सीमांचे रक्षण करणे, तस्करी, बेकायदेशीर इमिग्रेशन, इतर सीमापार गुन्ह्यांचा प्रतिकार करणे, युद्धाच्या काळात देशात शांतता राखणे, इत्यादी. फोर्सनुसार कामांचे विभाजन झाले आहेत आणि प्रत्येक फोर्स फक्त आपल्या करत असलेल्या कामामुळे विभाजित आहेत.

सीआरपीएफ- सेंट्रल रिझर्व्ह पोलीस फोर्स आणि या फोर्सला भारत देशातील अनेक प्रकारच्या सुरक्षा सोपविण्यात आल्या आहेत. यामध्ये सार्वजनिक लोकांची सुरक्षा राखणे, एखादा कायदा मंजूर झालेला असल्यास त्याची अंमलबजावणी करणे, सीमावर्ती सुरक्षा देणे, त्यानंतर आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षा, मदत प्रदान करणे, सुरक्षेच्या ठिकाणी तपासणी करणे, शांतता राखणे, गुन्ह्यांचा तपास करणे, आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ कार्यवाही करणे, विशेष ऑपेरेशन, आपत्ती निवारण, निवडणुकांमध्ये वाढीव सुरक्षा पुरविणे आणि कार्यक्रमांमध्ये सहायता देणे अशा अनेकविध सरकारी किंवा सामाजिक सुरक्षा, सुविधेचे काम सीआरपीएफ करते.

!! सीआरपीएफ स्थापना दिनानिमित्त संबंधित जवानांचे हार्दिक अभिनंदन जी !!

खडसून...

कुणी होई अस्वस्थ
सत्ता गेली रे म्हणून
सावरले ना धक्क्या
डोकेजाय भणाणून

कमकुवत करे वृक्षा
मुळे उपटती खणून
दिसे तिथे रोध करी
पाडायचे बेत हाणून

सहशीलता मर्यादेत
धराल किती ताणून
बसा जरा विरोधात
खुर्चीद्यायची सोडून

कुणीहोतो आश्वस्थ
सत्ताआलीयं म्हणून
विश्वास बसेना मुळी
विजय घ्या दणाणून

मात नजाय मस्तकी
डाव जाईल रे मोडून
हिटलरशाही घुसता
आपत्ती घ्यालओढून

सोने करावे संधीतून
अत्तरी कुप्या उघडून
समस्या सुटो समस्त
परिस्थितीशीझगडून

पहात असते जनता
अदृश्यनजरे अडसून
मताधिकारमहाअस्त्र
जाब विचारे खडसून

-- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६..

हवापालट...

पक्ष बदल
करावा
जराशी हवा पालट
भले कुणी करूद्या
रे चर्चा उलट सुलट

सारखे तेचं खाऊन
गोडही भासते तुरट
चव यायलाजिभेला
हो चटपटीत तिखट

एकाचंपक्षातराहती
कसेनिष्ठावंतचिकट
तत्व जपत बसतात
स्वभाव भारी हेकट

योग्यपक्षात रहायचे
नको कधीही संकट
सत्तेअसता सहजते
न येई स्थिती बिकट

बाकी कोलमडू पडे
आपला धावे शकट
कधी एकलपक्षांतर
कधी परिवारासकट

पक्ष बदल सर्वोत्तम
स्व स्थाना बळ कट
मागेलावतीलं झेंगट
नको नंतर कट कट

आपल्याजाण्यामुळे
जुन्यापक्षात लटलट
नव्यापक्षात बस्तान
स्थान तसेच दणकट

-- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६..

कलाम साहेबांच्या पावण स्मृतींना विनम्र अभिवादन!

(२७-३० जुलैः ए.पी.जे. अब्दुल कलाम पुण्यतिथी विशेष)



इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट शिलाँग येथे व्याख्यान देत असताना डॉ. कलाम साहेब कोसळले आणि दि. २७ जुलै २०१५ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ८३व्या वर्षी त्यांचे दुःखद निधन झाले. राष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांसह लाखो लोक त्यांच्या गावी रामेश्वरम येथे आयोजित अंत्यसंस्कार समारंभास उपस्थित होते. तेथे त्यांना सन्मानाने दफन करण्यास संपूर्ण राज्य उलटले होते. त्यांच्या पावन स्मृतींना उजाळा देणारा श्री एन. के. कुमार यांचा हा लेख... संपादक.

डॉ. अवुल पाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम ऊर्फ ए.पी.जे अब्दुल कलाम यांची सन २००२मध्ये सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आणि तत्कालीन विरोधी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या पाठिंब्याने भारताचे ११वे राष्ट्रपती म्हणून निवड झाली. त्यांना पीपल्स प्रेसिडेंट- जनतेचे राष्ट्रपती म्हणून व्यापकपणे संबोधले जाते. राष्ट्रपती पदानंतर ते शिक्षण, लेखन आणि सार्वजनिक सेवेच्या नागरी जीवनात परतले. भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या भारतरत्नसह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांचे ते प्राप्तकर्ते होते. ते एक भारतीय एरोस्पेस शास्त्रज्ञ होते. तसेच त्यांनी २००२ ते २००७ या काळात भारताचे ११वे राष्ट्रपती म्हणून देखील काम केले होते. कलाम हे तामिळनाडूच्या रामेश्वरम येथे वाढले होते आणि तेथेच त्यांनी भौतिकशास्त्र व एरोस्पेस अभियांत्रिकीचा अभ्यास केला. त्यांनी पुढील चार दशके शास्त्रज्ञ आणि विज्ञान प्रशासक म्हणून काम केले. त्यांनी प्रामुख्याने संरक्षण संशोधन आणि विकास संस्था- डीआरडीओ आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था- आयएसआरओ येथे काम केले. भारताच्या नागरी अंतराळ कार्यक्रमात आणि लष्करी क्षेपणास्त्र विकासाच्या प्रयत्नांमध्ये त्यांचा खुप मोठा सहभाग होता. अशा प्रकारे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि प्रक्षेपण वाहन तंत्रज्ञानाच्या विकासावर केलेल्या कामामुळे ते भारताचे मिसाइल मॅन म्हणून ओळखले जाऊ लागले. सन १९९८मध्ये भारताच्या पोखरण-२ अणुचाचण्यांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण संघटनात्मक, तांत्रिक आणि राजकीय भूमिका बजावली. सन १९७४मध्ये भारताने केलेल्या मूळ अणुचाचणीनंतरची ही पहिलीच चाचणी होती.

डॉ. अवुल पाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम यांचा जन्म दि. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी पंबन बेटावरील रामेश्वरमच्या तीर्थक्षेत्रात तेव्हाच्या मद्रास प्रांतात आणि आजच्या तामिळनाडू राज्यात एका तमिळ मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे वडील जैनुलाब्दीन मारकायर हे बोटीचे मालक आणि स्थानिक मशिदीचे इमाम होते. त्यांच्या आई आशिअम्मा गृहिणी होत्या. त्यांचे वडील बोटीतून हिंदू यात्रेकरूंना रामेश्वरम आणि आता निर्जन झालेल्या धनुषकोडी दरम्यान घेऊन जात होते. ते त्यांच्या कुटुंबातील चार भाऊ आणि एका बहिणीमध्ये सर्वात लहान होते. त्यांचे पूर्वज हे श्रीमंत मारकायर व्यापारी आणि जमीनींचे मालक होते, तसेच त्यांच्याकडे असंख्य मालमत्ता आणि मोठ्या प्रमाणात जमीनी होत्या. जरी त्यांचे पूर्वज श्रीमंत मारकायर व्यापारी होते, तरीही सन १९२०च्या दशकात कुटुंबाने आपली बहुतेक संपत्ती गमावली होती. डॉ. कलाम यांचा जन्म झाला तोपर्यंत ते गरिबीने ग्रस्त होते. मारकायार हे तमिळनाडू आणि श्रीलंकेच्या किनारपट्टीवर आढळणारे मुस्लिम वंशीय आहेत, जे अरब व्यापारी आणि स्थानिक महिलांचे वंशज असल्याचा दावा करतात. त्यांच्या व्यवसायात मुख्य भूप्रदेश, बेट, श्रीलंका हे ठिकाण आहेत. तेथून किराणा मालाचा व्यापार करणे तसेच मुख्य भूमी आणि पंबन दरम्यान यात्रेकरूंना नेणे यांचा समावेश होता. कुटुंबाच्या तुटपुंज्या उत्पन्नात भर घालण्यासाठी लहानपणी त्यांना वर्तमानपत्रे विकावी लागली. सन १९१४मध्ये मुख्य भूभागावर पंबन पूल उघडल्यानंतर तथापि, व्यवसाय अयशस्वी झाले. वडिलोपार्जित घराव्यतिरिक्त कालांतराने कौटुंबिक संपत्ती आणि मालमत्ता नष्ट झाली.

त्यांच्या शालेय वर्षांमध्ये त्यांना सरासरी गुण मिळायचे, परंतु त्यांना शिकण्याची तीव्र इच्छा असलेले एक तेजस्वी आणि मेहनती विद्यार्थी म्हणून ओळखले जायचे. ते त्यांच्या अभ्यासात विशेषतः गणितावर बराच वेळ घालवायचे. श्वाट्र्झ हायर सेकंडरी स्कूल, रामनाथपुरम येथे शिक्षण पूर्ण केल्यानंतर कलाम साहेबांनी सेंट जोसेफ कॉलेज तिरुचिरापल्ली येथे प्रवेश घेतला. हे महाविद्यालय तेव्हा मद्रास विद्यापीठाशी संलग्न होते. तेथून त्यांनी सन १९५४मध्ये भौतिकशास्त्रात पदवी प्राप्त केली. मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये एरोस्पेस अभियांत्रिकीचा अभ्यास करण्यासाठी ते सन १९५५मध्ये मद्रासला गेले. ते एका वरिष्ठ वर्गाच्या प्रकल्पावर काम करत असताना डीन त्यांच्या प्रगतीच्या अभावामुळे असमाधानी होते. पुढील तीन दिवसांत प्रकल्प पूर्ण न झाल्यास त्यांची शिष्यवृत्ती रद्द करण्याची धमकी दिली. त्यांनी अंतिम मुदत पूर्ण करून डीनला प्रभावित केले. फायटर पायलट होण्याचे त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यात ते थोडक्यात चुकले, कारण ते पात्रता फेरीत नवव्या स्थानावर होते आणि आयएएफमध्ये फक्त आठ जागा उपलब्ध होत्या.

प.पू. कलाम साहेब शिलाँगच्या भारतीय शास्त्र व्यवस्थापन येथे पृथ्वी नावाचा एक जिवंत ग्रह तयार करणे या विषयावर व्याख्यान देण्यासाठी गेले. पायरीवरून जात असताना त्यांना काहीसे अस्वस्थ वाटले. परंतु थोड्या विश्रांतीनंतर सभागृहात प्रवेश करण्यास सक्षम झाले. संध्याकाळी सुमारे साडेसहा वाजता व्याख्यान देताना ते स्टेज वरून कोसळले. त्यांना जवळच्या बेथनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. आगमनानंतर त्यांच्यात नाडी किंवा जीवनाची इतर चिन्हे दिसली नाहीत. आयसीयू युनिटमध्ये ठेवण्यात आले, तरी त्यांना सायंकाळी ७-४५ला हृदयविकाराच्या दुसऱ्या झटक्यानंतर मृत घोषित करण्यात आले. ती काळरात्र होती दि. २७ जुलै २०१५ रोजीची! त्यांच्या अंत्यसंस्कार प्रसंगी ३० जुलै रोजी पंतप्रधान, तामिळनाडुचे राज्यपाल, कर्नाटक, केरळ व आंध्रप्रदेश येथील मुख्यमंत्री यांच्यासह साडेतीन लाखाहून अधिक लोक उपस्थित होते.

!! अशा या महान शास्त्रज्ञांस स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !!

हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रशासन सज्जः शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन : पालकमंत्री मकरंद पाटील यांची ग्वाही

वृत्तसंस्था/बुलढाणा

जिल्ह्यातील सोयाबीन व मका पिकांवर हुमणी अळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकरी अडचणीत आले असले तरी, या संकटावर मात करण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी दिली आहे.

प्राथमिक अहवालानुसार जिल्ह्यात ३१३ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून, कृषी विभाग व जिल्हा प्रशासनाकडून युद्धपातळीवर उपाययोजना सुरू आहेत. बाधित क्षेत्रातील पंचनामे जलदगतीने सुरू असून, शेतकऱ्यांना लवकरच मदत मिळवून दिली जाईल, असेही पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले.

हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्रे, शास्त्रज्ञ व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी २४ जुलै रोजी प्रसारित केलेल्या तांत्रिक बुलेटिननुसार, अळीच्या जीवनचक्रावर आधारित एकात्मिक व्यवस्थापनाची अंमलबजावणी करण्याचे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक मनोज ढगे यांनी केले आहे.

हुमणी अळी नियंत्रणासाठी उपाययोजनाः हुमणी अळी ओळखणेः हुमणी अळी इंग्रजी 'ए' अक्षराच्या आकाराची असून, पूर्ण वाढ झाल्यावर ती तीन ते पाच सेंटीमीटर रुंद आणि पांढुरक्या रंगाची असते. ही अळी सोयाबीन, कपाशी, तूर, ज्वारी, मूग, ऊस, सूर्यफूल, मिरची आणि वांगी यांसारख्या पिकांच्या मुळांवर उपजीविका करते. यामुळे पिके कमकुवत होऊन जमिनीवर कोलमडतात. पिकांमध्ये हुमणी अळीचा प्रादुर्भाव ओळखण्यासाठी, बाधित झाडांची पाने पिवळी पडून सुकतात.

सौम्य प्रादुर्भावासाठी जैविक नियंत्रणः जर शेतात हुमणी अळीचा सौम्य किंवा तुरळक प्रादुर्भाव आढळल्यास, 'मेटारायझियम' (र्शूीर्ैंप्ल्स) या जैविक कीटकनाशकाचा वापर करावा. ४० मिली 'मेटारायझियम' १० लिटर पाण्यात मिसळून पिकांच्या मुळाजवळ टाकावे. तसेच, १ किलो 'मेटारायझियम' भुकटी १०० किलो शेणखतात मिसळून प्रति हेक्टर शेतात फेकावी. हे जैविक कीटकनाशक वापरताना शेतात पुरेशी ओल असल्याची खात्री करावी.

तीव्र प्रादुर्भावासाठी रासायनिक नियंत्रणः हुमणी अळीचा तीव्र किंवा लक्षणीय प्रादुर्भाव आढळून आल्यास, स्थानिक तज्ज्ञांच्या सल्ल्याने रासायनिक कीटकनाशकांचा सुरक्षित वापर करावा. इग्ज्दिहग्त ४०इ्र घर्स्र्म्त्दज्ञ् ४०इ या मिश्र दाणेदार कीटकनाशकाचे ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात द्रावण तयार करून झाडाच्या खोडाजवळ टाकावे. ऊर्प्रेसूर्प्दैस्०.९इ्र इग्ज्दिहग्त २इ या मिश्र दाणेदार कीटकनाशकाचा १२ ते १५ किलो प्रति हेक्टर या प्रमाणात जमिनीत ओलावा असताना झाडाच्या खोडाजवळ वापर करावा.

शेतकऱ्यांनो, रसायनांचा वापर करताना लेबलवरील मार्गदर्शक सूचना व प्रमाणाचे काटेकोर पालन करावे. कोणतेही मिश्रण टाळून, तज्ज्ञांच्या सल्ल्याने योग्य उपचार करावेत. 'शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. या नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत,' अशी ग्वाही ना. मकरंद पाटील यांनी यावेळी दिली.

खोटे अहवाल पुन्हा सादर केल्यास आंदोलन चिघळणार - ग्रामस्थ वाई तहसीलदारांच्या अनुपस्थितीत प्रशासकीय कमिटी क्रशर ठिकाणी

वाई प्रतिनिधी प्रशांत थोरवे

आंदोलनाच्या १०व्या दिवशी शासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने उपजिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने यांच्या अध्यक्षतेखालील एक समिती तयार केली. या समितीकडून लवकरात लवकर अहवाल मिळाल्यावर तातडीने याप्रकरणी निकाल देण्याचा प्रयत्न शासन करेल.



आज दगडखाण व क्रशर असणाऱ्या ठिकाणी शासनाच्या जवळपास सर्वच विभागांचे अधिकारी त्या ठिकाणी उपस्थित होते.ज्यामध्ये प्रामुख्याने महसूल, कृषी, वन, पाणीपुरवठा, पंचायत समिती याचबरोबर इतरही विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते. दगडखाण परिसरातील वेगवेगळ्या तक्रारी यांच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी यांचे पथक त्या ठिकाणी पोहोचले. यावेळेस ग्रामस्थ सुद्धा मोठ्या संख्येने त्या ठिकाणी उपस्थित होते. सर्व बेकायदेशीर गोष्टी उपजिल्हाधिकारी यांना घटनास्थळी दाखवण्याचा प्रयत्न ग्रामस्थांनी केला.

दगडखाण व क्रशर शेजारी वनविभागीची हद्द ५०० मीटर इतकी असल्याची खोटी माहिती कागदपत्रांमध्ये देण्यात आली होती. ज्यावर वन विभागाने योग्य पद्धतीची माहिती द्यावी ही मागणी ग्रामस्थांनी केली. दगडखानी शेजारी ओढा नाल्याची माहिती यापूर्वी महसूल विभागाने दिली होती मात्र आज त्याठिकाणी असणारा भला मोठा ओढा व ओढ्याच्या दोन्ही बाजूला खडी व क्रशस्टॅन्डचा स्टॉक उपजिल्हाधिकारी यांनी स्वतः पहिला. मागील १.५ वर्षांपासून क्रशर बंद असल्याची खोटी माहिती अनेक वेळा वरिष्ठांना देणाऱ्या वाई प्रशासनाची पुरती पोल खोल क्रश सँड व खडीचे मोठ मोठे ढिगारे बघून झाली. क्रशर कडे जाणारा ?क्सेस रोड कसा अस्तित्वात नाही याबद्दल सुद्धा योग्य माहिती घटनास्थळी ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांना दिली. त्यामुळे आता समितीकडून योग्य पद्धतीचा अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात येईल.याबाबतीत आंदोलक आशावादी आहेत. याबाबतीतचा अहवाल येणाऱ्या काही दिवसातच समजेल. अधिकाऱ्यांच्या अहवालांवर हे आंदोलन चिघळणार की थांबणार हे लवकरच आपल्यासमोर येईल.

जोर गावात पावसामुळे तात्पुरता केलेला दगडी पूल वाहून गेला; स्थानिक नागरिकांची गैरसोय

वाई प्रतिनिधी प्रशांत थोरवे

वेलंग पुढारी वृत्तसेवा वाई जोर बलकवडी हे पावसाचे आगार असल्याकारणाने व तालुक्याच्या पश्चिम टोकावर वसलेल्या जोर गाव परिसरात शुक्रवार रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे स्थानिक ओढ्यावर दगडी बांधकाम करून उभारलेला तात्पुरता पूल पूर्णतः वाहून गेला आहे. परिणामी, गावातील नागरिकांना कामधंदा, शिक्षण व दैनंदिन प्रवासासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.



या पुलावरून दररोज अनेक विद्यार्थी नांदगणे शाळेत जात असतात. मात्र सध्या पूल आणि रस्ते तुटल्याने एसटी बससेवाही बंद झाली आहे. यामुळे विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांचे हाल सुरू आहेत.

स्थानिक ग्रामस्थांची मागणीः स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासन व लोकप्रतिनिधींनी तातडीने हस्तक्षेप करून या भागासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. दरवर्षी पावसाळ्यात हीच समस्या उद्भवत असून प्रवासात अडथळे निर्माण होतात.

हा रस्ता धोम-बलकवडी पाटबंधारे विभागाच्या आकातारीत असून, त्यांच्या गलथान कारभारामुळे नागरिकांना दरवर्षी अशा संकटाचा सामना करावा लागतो, अशी तीव्र नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

ग्रामस्थांचा ठाम आग्रहः वाहून गेलेल्या तात्पुरत्या पुलाच्या जागी आरसीसी पद्धतीने स्थायिक पूल बांधावा व नागरिकांना सुरक्षित व सुलभ मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

कराड तालुक्यातील नडशीत बिबट्याचा दुचाकी वर हल्ला; ग्रामस्थात चर्चा उलट सुलट चर्चा



कराड सातारा प्रतिनिधी

कराड तालुक्यातील नडशी येथील तळी नावाच्या शिवारात शुक्रवारी सकाळी एका बिबट्याने मोटार गाडीवरून जाणाऱ्या समाधान माने या युवकावर हल्ला केला. पाठीमागून मोटार वरून द्विचाकी वर येणाऱ्या अमोल पवार या युवकाने प्रसंगावधान राखून आरडाओरडा केल्याने बिबट्या पळून गेला या हल्ल्यात छोट्या दू व्हीलर ची मागील सीट फाटली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर वनरक्षक कर्मचारी घटनास्थळी भेट देऊन वरिष्ठांच्या सूचनेनुसार कॅमेरा ट्रॅप व पिंजरा लावण्यात आला आहे या घटनेमुळे नडशी गावात व परिसरात चर्चेला उधाण आले आहे दरम्यान सातारा उपवन संरक्षण सातारा यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागातील कर्मचाऱ्यांनी ड्रोन च्या माध्यमातून बिबट्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. परिसरात ऊस शेती जास्त आहे त्यामुळे ड्रोन चा वापर करण्यात आला

ग्रामपंचायतच्या भ्रष्टाचाराचा कळस ?

धारुर/सोमेश्वर सोनटक्के

पाण्यासारखा पैसा पाण्यात घातल्याने देव दहिफळ मधील रस्ते पाण्याने माखले सरपंच व ग्रामसेवक कारवाई होईल का ? सोमेश्वर सोनटक्के सत्तेवर बसल्यास सत्ता कशी चालवून स्वतःची घरे भरायची हे पाहायचे असेल तर धारूर तालुक्यातील मौजे देवदयफळ ग्रामपंचायत चे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. गत दोन अडीच वर्षापासून सौ स्मिता श्रीधर बडे ह्या लोकनियुक्त सरपंच असून त्यांचा सर्व आर्थिक कारभार प्रतीच पाहतात मग विकास कामे असो की आर्थिक देवाण-घेवाण. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य व केंद्र सरकार ग्रामपंचायतला भेट निधी वितरित करत असल्याने अनेक सरपंच कसे मालामाल झालेलं पाहायला मिळतात. कृष्णाच्या वित्त आयोग नरेगा दलित वस्ती घरकुल या सर्व



कामांचे देदे फळ ग्रामपंचायत मध्ये ३ १३ ९ १२ वाजलेली ग्रामस्थांना विकासाच्या संकल्पनेपासून खूप दूर राहावे लागत असल्याचे चित्र दिसत आहे अनेक वर्षापासून ग्रामसेवक म्हणून कार्यरत असलेले रमेश आनंद देशमुख हे तर मुख्यालय न राहता लातूर अथवा अंबाजोगाई येथे वास्तव्य करून इथला कारभार हप्तात त्यामुळे विकासाला खेळ बसत असून ग्रामस्थांनी कॉल केल्यास त्या कॉल ला उत्तर देण्याची दानत सुद्धा देशमुख दाखवत नाही राज्य वाक्याचा सरकार जेवढ्या योजनांसाठी निधी उपलब्ध करून देते त्यातील एकही योजना देव-देवता ग्रामपंचायत मध्ये नीट राबवली जात नाही त्यामुळे असून अडचण नसून खांबा अशी स्थिती गावाची झालेली आहे त्याला कारणही तसेच आहे ते म्हणजे निष्क्रिय ग्रामसेवक रमेश आनंदराव देशमुख व राजकीय सरपंच बडे. एकच काम करून त्यासाठी दोन दोन हेड मधून खर्च केल्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी गावात रस्ते पाणी वीज आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सुविधा देणे क्रमप्राप्त असते परंतु त्यातील एकही इथं नियमाप्रमाणे होत नाही. एखाद्या कामासंदर्भात ग्रामसेवक रमेश आनंदराव देशमुख याला विचारणा केल्यास ते ग्रामस्थांना जेलमध्ये टाकण्याची भाषा वापरतात. जागृत देवस्थान श्रीक्षेत्र खंडोबा इथं असल्याने फार दूर धरून लोक खंडोबाच्या प्रति लीन होण्यासाठी येत असतात त्यामुळे सहाजिकच गावची ख्याती सर्वदूर पोचलेली आहे तरीही विकास कामात अपेक्षित प्रगती करण्यात अपयश येत आहे वरून पैसा येतो खाली खर्च होतो विकास होत नाही मग पैसा जातोच कोठे याचाही सारासार विचार होणे गरजेचे आहे जवळपास अडीच हजार लोकसंख्या असलेल्या या गावात एकूण पाच दलित वस्ती असून एकाही वस्तीला कोणतीच योजना पोचलेली नाही उलट समाज मंदिरात रंगरंगोटी करून वित्त आयोगातून दीड लाख रुपये खर्च केल्याची चर्चा गावात होत आहे आतापर्यंत विकासाच्या नावाखाली जिथे जिथे पैसा खर्च केला त्याची हेडवाईज चौकशी केल्यास भ्रष्ट ग्रामसेवक व त्याचे साथीदार यांना जेल चा रस्ता मात्र दूर नाही म्हणून सर्वच कामाची सखोल चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

श्री क्षेत्र अण्णापूर (ता.शिरूर ,जि पुणे.) येथे अखंड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला सुरुवात

रांजणगाव गणपती प्रतिनिधी : बाळासाहेब कुंभार

संत परंपरेतील अखेरचे संतश्री निळोबाराय यांच्या जन्मभूमीतील, प्रभू श्री रामचंद्र यांच्या पदस्पर्शाने पावन अशा व नाथ संप्रदायचे श्री गहिनीनाथ महाराजांच्या वास्तव्याने आणि पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्य भूमीत तसेच घोडनदीच्या पवित्र तीरावरील व ढग्या डोंगराच्या पायथ्याशी विसावलेल्या श्री क्षेत्र अण्णापूर येथे ह्या सोहळ्याला सुरुवात झाली असून गेली सलग तीन तपे पूर्ती म्हणजेच अखंड हरिनाम सप्ताहाचे हे ३६ वे वर्ष असून तो मोठ्या आनंदात साजरा होत आहे .



या सप्ताह मध्ये महाराष्ट्रातील प्रसिद्ध, ख्यातनाम कीर्तनकार, प्रबोधनकार यांच्या भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हिंदू धर्म वाढवावा, तरुण मुल व्यसनापासून दूर जावीत, भजन, गायन, प्रवचन कीर्तनकार तयार व्हावेत अध्यात्माची ओढ निर्माण व्हावी, वयोवृधांचा मुलांनी सांभाळ करावा, थोरामोठ्यांचा आदर व्हाव संस्कृती आणि परंपरा ह्या टिकून रहाव्यात अशा अनेक संकल्पना यावर आधारीत ह्या साप्ताहाच दरवर्षी नियोजन केल आहे.

ह्यावर्षी ग्रामभूषण ह.भ.प विलास महाराज पवार यांच्या कीर्तनानने सप्ताहाला सुरुवात होणार आहे.

तर महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार ह.भ.प. गुलाब महाराज खालकर (आर्वी जुन्नर) यांच्या काल्याच्या कीर्तनाने साप्ताहची सांगता होणार आहे

मधल्या दिवसांमध्ये सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. शिवाजी महाराज जगताप (बीड), झी टॉकीज फेम प्रा.ह.भ.प. नवनाथ महाराज माशेरे आमदाबाद, रामायणाचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज रासकर (श्री.संत निळोबाराय जन्म भूमी रामलिंग), युवा कीर्तनकार ह.भ.प. मोहिनीताई आवारी (वाडेगव्हाण, पारनेर), वाणीभूषण ह.भ.प.गणेश महाराज शिंदे (उदापूर), प्रबोधनकार ह.भ.प. पोपट महाराज राक्षे (राजगुरूनगर) या सर्वांचे विचार दररोज सायं ८ ते १० यावेळेत अण्णापूर, ता. शिरूर येथे श्री. विठ्ठल रखुमाई माता मंदिर येथे ऐकायला मिळणार आहे.

या सप्ताह मध्ये महाप्रसाद हा सायं ७ ते ८ यावेळेत असून ह्या साठी गावातील सर्वच अन्नदात्यांकडून मोठया प्रमाणात अन्नदान दिल जाते अशी माहिती अण्णापूर गावचे सामाजिक कार्यकर्ते संतोष झंजाड यांनी दिली.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन हरिपाठ भजनी मंडळ तसेच ग्रामपंचायत आजी माजी सरपंच ,उपसरपंच सर्व सदस्य एकजुटीने कसलाही मतभेद न ठेवता राजकारण बाजूला ठेऊन करत असतात. याचं उत्तम उदाहरणं अण्णापूर मध्ये या निमित्ताने पाहायला मिळत.

कुंभारगणी येथे शिवेंद्रराजेंच्या माध्यमातून छत्र्यांचे वाटप



खंडाळा प्रतिनिधी गणेश गुरव

सातारा जिल्ह्यातील दुर्गम अशा अतीपर्जन्यवृष्टी असणाऱ्या जावली तालुक्यातील कुंभारगणी या गावामध्ये नागरिकांना पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी मोफत छत्री वाटपाचा एक छोटासा पण उपयोगी उपक्रमातून महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. ना. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांच्या सौजन्याने व कुंभारगणी गावचे सरपंच संजय शेलाटकर यांच्या संकल्पनेतून कुंभारगणी गावातील विद्यार्थी व ग्रामस्थांना मोफत छत्र्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी सुधाकर शेलाटकर, सुनील जाधव, वामन आढाव, बाजीराव भिलारे, साहेबराव भिलारे, आनंदीबाई भिलारे, गोरक्षनाथ भिलारे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गणेश जगताप आणि ग्रामपंचायत सदस्य, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सैनिकांचा सन्मान करणारा देशच आज जगावर वर्चस्व प्रस्थापित करू शकेल : उपप्राचार्य आबाजी धायगुडे

लोणंद, प्रतिनिधी/ मंगेश माने

लोणंद- लोणंद दिनांक २६ जुलै २०२५. येथील मालोजीराजे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज,लोणंद मध्ये २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा झाला. या दिनाचे औचित्य साधून विद्यालयांमध्ये वीर पत्नींचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.या निमित्ताने लोणंद पंचक्रोशीतील वीर पत्नी उपस्थित होत्या. श्रीमती. वनिता संतोष ठोंबरे, श्रीमती. अर्चना प्रकाश शेळके व श्रीमती. पुनम सुभाष कराडे यांचा विद्यालयाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.



समाजामध्ये प्रत्येक व्यक्ती देशासाठी काही ना काही करीत असते डॉक्टर, वकील, शेतकरी, व्यावसायिक, शिक्षक अशा सर्व क्षेत्रांमध्ये कार्य करणारे लोक देशाची सेवा करतात परंतु खरी देश सेवा ही देशाचे रक्षण करणारा जवान आणि सैनिकी अधिकारी हेच सर्वश्रेष्ठ सेवेकरी आहेत. ज्या देशांमध्ये सैनिकांचा योग्य सन्मान केला जाईल तोच देश आजच्या स्थितीत जगावर वर्चस्व प्रस्थापित करू शकतो. असे प्रतिपादन विद्यालयाचे उपप्रचार्य आबाजी धायगुडे यांनी केले.

वीर पत्नी अर्पणा शेळके यांनी आपल्या सत्काराला प्रतिउत्तर देताना म्हणाल्या की देशाचे रक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आणि ज्यांनी देशासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दिले आहे त्यांचा आपण सर्वांनी सन्मान राखूया आणि या देशाचे भविष्य उज्वल करूया. सर्व शहीद जवानांच्या कुटुंबियांच्या वतीने त्यांनी सत्कार केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. आणि एवढ्या बलिदान नंतर सुद्धा आम्हाला देशाची सेवा करण्याची संधी मिळाल्यास आम्ही अग्रेसर असू अशी ग्वाही दिली. वीर पत्नींच्या अनुभव कथनाने सर्व एनसीसी कॅडेट भावुक झाले.

२२ महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल एम. ए.राजमन्नार (सेना मेडल) हे देखील १९९९ च्या कारगिल युद्धाचे प्रमुख युद्धे होते. आज शासकीय कार्यक्रमा मध्ये त्यांचा व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचा सन्मान सातारा सैनिकी शाळा येथे संपन्न झाला. त्यांनी ही विद्यालयातील या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. शासकीय कार्यक्रमांमध्ये प्रभात फेरी व कारगिल युद्धामध्ये सहभागी असणाऱ्या जवान आणि सैनिकी अधिकाऱ्यांचा सन्मान केला गेला.

मालोजीराजे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज,लोणंद मध्ये वीर पत्नींचा सत्कार करण्याची संकल्पना माननीय प्राचार्य तथा रयत शिक्षण संस्थेचे समन्वय समिती सदस्य चंद्रकांत जाधव यांनी मांडली व त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

शहीद जवान संतोष ठोंबरे यांचा चिरंजीव कॅडेट आकाश ठोंबरे यानेही आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या वडिलांच्या शौर्याची गाथा त्याने कॅडेट समोर मांडताच विद्यालयातील विद्यार्थ्यांना भारतीय सेना दला बद्दल विशेष आदर निर्माण झाला. विद्यालयाच्या विद्यार्थिनी उमा क्षीरसागर व अंकिता मराठे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

शिक्षक मनोगतामध्ये एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट महेश जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना २२ महाराष्ट्र एनसीसी बटालियन सातारा यांनी दिलेल्या विशेष संधीबद्दल आभार मानले व जास्तीत जास्त कॅडेट अधिकारी तसेच सैन्य दलात भरती होतील अशी अशा व्यक्त केली. एनसीसीच्या माध्यमातून उत्तम नागरिक तयार होतील यासाठी एनसीसी विभागाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जातील अशी ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी २२ महाराष्ट्र एनसीसी बटालियन साताराचे कमांडिंग ऑफिसर कर्नल एम ए राजमन्नार (सेना मेडल) ?डमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर कर्नल आनंद सिंग, सुभेदार मेजर तानाजी भिसे, ट्रेनिंग जेसीओ संभाजी शिंदे सर्व पीआय स्टाफ जे सी ओ, एन सी ओ, सिविल स्टाफ, लष्कर पार्टी यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक एनसीसी ऑफिसर विठ्ठल ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. गिरीश दाभाडे यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्युनिअर कॉलेजच्या प्राध्यापिका सौ सुवर्णा सरोदे प्रा. रमेश लोखंडे, उप मुख्याध्यापक लक्ष्मण नेवसे, पर्यवेक्षक विष्णू काटकर सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले. सर्व कार्यक्रमाचे फलक लेखन कलाशिक्षक टि.के पवार यांनी केलेकार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन सर्व एनसीसी कॅडेट, खुष्णुदी बागवान, अनुष्का पवार, योगिता चांगण व वेदिका गोवेकर यांनी केले.

साथीच्या आजारात आरोग्य सांभाळून तंदुरुस्त व आनंदी राहा



दैनिक जनप्रभात प्रतिनिधी- स्वरूप गिरमकर.

(पुणे) वाघोली : सुरुवातीला हवाहवासा वाटणारा पाऊस मात्र काही दिवसांनी नकोसा वाटू लागतो. कारण साथीच्या आजारांमुळे सर्वसामान्य जेरीस येतात.पावसाळ्यातील आजारांचे मूळ कारण म्हणजे दूषित पाणी, खराब अन्न व आजूबाजूला असणारी अस्वच्छता.बरेचदा ताप, थंडी, खोकला, कावीळ, उलटी, जुलाब या आजारांनी लहान मुले, वृद्धांना त्रास होतो. सुरुवातीला साधा वाटणाऱ्या सर्दी-खोकला, तापाकडे वेळीच लक्ष दिले नाही तर मलेरिया, डेंग्यूच्या तापाचेही निदान होऊ शकते. त्यामुळे योग्य तपासणी करून आजाराबाबत वेळीच खातरजमा करावी अन्यथा सर्दी-पडसे समजून अंगावर काढणे महागात पडू शकते.

डेंग्यू : पावसाळ्यात सर्रास दिसून येणारा आजार. दरवर्षी येणाऱ्या रुग्णांपैकी २०-२५ साथीच्या रुग्णांमध्ये या आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांचे प्रमाण दिसून येते. डेंग्यूची लक्षणे सहज ओळखता येतात. अतिताप, रक्तातील प्लेटलेट्सचे प्रमाण कमी होणे, अंगावर चट्टे ही प्राथमिक लक्षणे दिसून आल्यास त्वरीत डॉक्टरांना भेटणे आवश्यक आहे. घरात अथवा कार्यालयात डासांसाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे.

- डॉ. योगेश आहेर, खराडी, पुणे.

चिकनगुनीया : साचलेलं पाणी, एसी, कुलरप्लाण्टमधून होणारा पाण्याचा निचरा, पाण्याची पाइपलाइन तसेच भांडी आदीवर घोंगावणारे मच्छर यांमुळे चिकनगुनिया होऊ शकतो.

- डॉ. अमृता कोटांबे, वाघोली, पुणे.

वाघोली - हिंजवडी बससेवेचा शुभारंभ!



दैनिक जनप्रभात प्रतिनिधी - स्वरूप गिरमकर

(पुणे) वाघोली : आज नव्या बस सेवेचे उदघाटन वाघोली येथून मा आमदार बापूसाहेब पठारे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडले. या प्रसंगी प्रवाशांचे गुलाब पुष्प देऊन मनापासून स्वागत करण्यात आले.

ही सेवा विशेषतः वाघोली आणि परिसरातील अशा नागरिकांसाठी फायदेशीर ठरणार आहे, जे दररोज हिंजवडी व माण फेज ३ या आयटी क्षेत्रांमध्ये नोकरीसाठी प्रवास करतात. या नव्या बस सेवेमुळे त्यांचा प्रवास अधिक सोयीस्कर, वेळ वाचवणारा आणि सुरक्षित होणार आहे.

याप्रसंगी मंचावर शासन नियुक्त नगरसेवक शांताराम बापूकटके, संदीप सातव, जॉईन एम.डी. नितीन नार्वेकर साहेब, एल.पी.आर.ओ. श्रीमती राऊत मॅडम, वाघोली डेपोचे डेपो मॅनेजर श्री. विजयकुमार मदगे, श्री सोमनाथ वाघोले साहेब आणि पीएमपीएमएलचे चालक, वाहक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे आणि पीएमपीएमएल प्रशासनाचे वाघोली मधील सर्व आयटी क्षेत्रातील व इंडस्ट्रियल क्षेत्रातील नोकरदार व कामगार यांनी आभार मानले.

राजू शंकर बिंदवाल व्हॉलीबॉल एनआयएस सर्टिफिकेट कोर्स परीक्षेत उत्तीर्ण



सोयगाव प्रतिनिधी भावराव मोरे

....छत्रपती संभाजीनगर नेताजी सुभाष नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्सतर्फे सिक्स विक सर्टिफिकेट कोर्स जुलै २०२५ दरम्यान कर्नाटक बेंगलोर येथे घेण्यात आलेल्या परीक्षेत देशातून एकूण ४५० प्रशिक्षकांनी हॉलीबॉल कोचिंग सर्टिफिकेट कोर्ससाठी सहभाग नोंदविला होता. यात सोयगाव तालुक्यातील गोदेंगाव येथील राजू शंकर बिंदवाल हा व्हॉलीबॉल एनआयएस सर्टिफिकेट कोर्स परीक्षेत उत्तीर्ण झाला आहे.

राजू शंकर बिंदवाल हा बेंगलोर या ठिकाणी असलेले भारतीय प्रशिक्षक हेमराज सिंग असिस्टंट हॉलीबॉल कोच यांच्या मार्गदर्शनाखाली एनआयएस सर्टिफिकेट कोर्स परीक्षेत उत्तीर्ण झाला आहे. राजू बिदवाल हा राज्यस्तरीय खेळाडू ' याने यापूर्वी अनेक राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा मध्ये कोच म्हणून काम केलेआहे.या निवडीबद्दल शालेय समिती अध्यक्ष.डॉ योगेश इंगळे, मुख्याध्यापक आर.एस.माळी ,उपमुख्याध्यापक एस. आर.दाभाडे प्रर्यवेक्षक जी.जी.ढाकणे यांसह सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर सहकारी यानी अभिनंदन केले आहे

शरद सहकारी बँक एनपीए व्यवस्थापन पुरस्काराने सन्मानित



आंबेगाव प्रतिनिधी

मंचर सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या मंचर (ता. आंबेगाव) येथील शरद सहकारी बँकेला 'सर्वोत्तम एनपीए व्यवस्थापन' (ू ॅँ ऍँ र्ऍँहुीसहू) या विभागात राष्ट्रीय अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग समिट अँड अ?वॉर्ड्स २०२५ या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बँकेचे संचालक दत्ता थोरात अजय घुले व मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देशमुख यांनी पुरस्काराचा स्वीकार केला. पुणे येथील हॉटेल कॉनराड - हिल्टन येथे २५ जुलै २०२५ रोजी आयोजित या कार्यक्रमार्ंण्ऍिंघ्दिर्स्ऍि संस्थेचे संस्थापक शुभम गुप्ता यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डिजिटायझेशन, कार्यक्षम कर्जवसुली यंत्रणा आणि पारदर्शक व्यवस्थापन या क्षेत्रात शरद बँकेने दाखवलेली कार्यक्षमता आणि नवोन्मेषी दृष्टिकोन या सन्मानास कारणीभूत ठरले. या पुरस्कारप्राप्तीनंतर शरद बँकेचे संचालक दत्ता थोरात आणि अजय घुले यांनी समाधान व्यक्त करत सांगितले की, राज्याचे माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे बँकेला कायम मार्गदर्शन लाभते. बँकेचे अध्यक्ष उद्योजक देवेंद्र शहा, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्व संचालक मंडळ एकदिलाने काम करत आहोत. बँकेच्या दूरदृष्टीपूर्ण धोरणामुळेच ही घवघवीत कामगिरी शक्य झाली आहे.' बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्रजी देशमुख यांनीही हा सन्मान बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या निष्ठेचे व परिश्रमांचे फलित असल्याचे नमूद केले.

शरद सहकारी बँकेने मिळवलेला हा राष्ट्रीय दर्जाचा पुरस्कार केवळ बँकेपुरताच मर्यादित न राहता, ग्रामीण व निमशहरी भागात कार्यरत सहकारी बँकांसाठी प्रेरणादायी ठरावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

शिरूर तालुका वकील संघटनेच्या अध्यक्षपदी ॲड. उदय सरोदे यांची निवड



शिरूर शहर (पुणे) प्रतिनिधी- अविनाश घोगरे

शिरूर तालुक्यातील वकिलांच्या प्रतिष्ठेचा आणि संघटनेच्या नेतृत्वाचा निर्णायक क्षण ठरलेल्या निवडणुकीत ॲड उदय जयवंत सरोदे यांनी सर्वाधिक मते मिळवत शिरूर तालुका वकील संघटनेच्या अध्यक्षपदाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली आहे. २३ जुलै २०२५ रोजी पार पडलेल्या या चुरशीच्या आणि बहुचर्चित निवडणुकीत त्यांनी आपल्या नेतृत्वक्षमतेची ठाम छाप सोडत वकिलांचा विश्वास संपादन करत अध्यक्षपदी विराजमान झाले आहे. अध्यक्ष पदासाठी एकूण चार जण निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. यामध्ये ॲड उदय जयवंत सरोदे (१२६), ॲड विकास फडतरे (१२४), ॲड भोलेनाथ पडवळ (६४), ॲड दिलीप कांबळे (९) याप्रमाणे मते मिळाली. तालुक्यातील विविध भागांतून आलेल्या आणि संघटनेच्या कार्यात सक्रीय सहभागी असलेल्या वकिलांनी या निवडणुकीत आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संघटनेच्या पुढील वाटचालीसाठी नव्या कार्यकारिणीकडे आशेने पाहिले आहे. अध्यक्षपदासोबतच इतर पदांसाठी झालेल्या निवडणुकीतही सक्षम आणि अनुभवी उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.

नव्याने निवडून आलेली कार्यकारिणी पुढीलप्रमाणेः अध्यक्षः ॲड उदय जयवंत सरोदेउपाध्यक्षः ॲड प्रज्ञा पवार व ॲड संजय भुजबळसचिवः ॲड रोहीत पोटावळे, खजिनदारः ॲड विशाल शेंडगे, सदस्यः ॲड प्रतिभा पठारे, ॲड प्रणिता जोशी, ॲड संदीप शेडकर, ॲड विवेक खांडरे, ॲड स्वप्नील शेलार यांची निवड झाली आहे निवडणुकीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना ॲड सरोदे म्हणाले, 'शिरूर तालुक्यातील वकिलांचे प्रश्न आणि त्यांचे न्याय हक्क यांचे प्रभावी संरक्षण, न्यायालयीन कामकाजातील अडथळे दूर करणे तसेच नव्या पिढीतील वकिलांना योग्य दिशा आणि संधी उपलब्ध करून देणे हे माझ्या कामाचे मुख्य केंद्रबिंदू राहील. संघटनेचा सर्वसामान्य सदस्यही या प्रवासात महत्त्वाचा भाग असणार आहे.'

ॲड उदय सरोदे हे गेली दोन दशके कायदा क्षेत्रात कार्यरत असून त्यांचा सामाजिक कार्यातही सक्रिय सहभाग आहे. आपल्या शांत, संयमी आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याच्या कार्यशैलीमुळे त्यांनी वकिलांच्या मनात विश्वासाची जागा निर्माण केली आहे. त्यांचे नेतृत्व संघटनेला नव्या उंचीवर नेईल, असा विश्वास तालुक्यातील वकिलांमधून व्यक्त केला जात आहे. शिरूर तालुका वकील संघटना ही न्यायप्रवेशाच्या क्षेत्रातील एक महत्त्वाची संस्था असून तिच्या माध्यमातून स्थानिक न्याय व्यवस्थेतील विविध प्रश्न मार्गी लावण्याचे कार्य सातत्याने होत आले आहे. नव्याने निवडून आलेल्या कार्यकारिणीकडूनही अधिक परिणामकारक आणि गतिमान कामकाज करण्याचीअपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

शरद भाऊसाहेब पवळेंना राज्यस्तरीय शिवशाही महारत्न पुरस्कार जाहीर



पुणे प्रतिनिधी विवेकानंद फंड

समाजसेवेचे व्रत घेऊन अहिल्यानगर पारनेर येथिल नारायणगव्हाण गावातील शरद भाऊसाहेब पवळे यांनी बालसंस्कार, व्यसनमुक्ती, दारूबंदी, वृक्षारोपण वृक्षसंवर्धन वनसंरक्षण, ग्राम एकता अभियान, सामाजिक कार्य करणाऱ्यांचा गौरव, गरजुंना दिवाळी भेट, नारायणगव्हाण चौपदरीकरण, कमांडमुक्त गाव लढा, बेरोजगारी, भुमिपुत्रांचा लढा, सुपा औद्योगिक वसाहतीत शेतकऱ्यांच्या भुखंडासाठी आंदोलन, जय कामगार चळवळ, जेष्ठ समाजसेवक आण्णा हजारे, पोपटराव पवार यांच्या सामाजिक कार्यामध्ये सहभाग, सामाजिक प्रश्नांवर १२ उपोषणे, रास्ता रोको, टोलबंद आंदोलन, पेरू वाटप आंदेलने यांसह सामाजिक ,शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर शेकडो तालुका जिल्हा राज्यस्तरीय यशस्वी जनजागृती जनआंदोलने करत प्रश्नासकीय न्यायालयीन लढा यशस्वी करत राज्यातील शेतकऱ्यांच्या शिव पाणंद शेतरस्त्यांच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधत महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळ उभी करून सरकार प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी राज्यभर मोठी चळवळ उभारून छत्रपती संभाजीनगर येथिल मुंबई हायकोर्ट येथे शिव पाणंद शेतरस्त्यांच्या प्रश्नावर रिट पिटीशन दाखल करून ६० दिवसात शेतकऱ्यांना मोफत शेतरस्ते खुले करून देण्याचा यशस्वी न्यायालयीन संघर्ष लढा, अहिल्यानगर मधील भव्य पेरू वाटप आंदोलन, राज्यभर विविध जिल्हाधिकार्यालयावर पेरू वाटप आंदोलन करत राज्यातल्या विविध तालुक्यांमध्ये प्रभावी चळवळ उभारून राज्यात शेकडो प्रलंबित शिव पाणंद शेत रस्ते खुले करण्यात मोठे यश प्राप्त झाले असुन राज्यभर शिवपाणंद नाव पोहचवुन अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकरी शिव पाणंद चळवळीत निस्वार्थपणे योगदान देत असुन आझाद मैदान येथे पुकारलेल्या आंदोलनानंतर राज्याच्या महसुलमंत्र्यांनी चळवळीच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद करत विशेष शासणनिर्णय राज्यात मिळवण्यात चळवळीला मोठ यश मिळाले शिव पाणंद शेतरस्त्यांना मोफत पोलिस संरक्षण, मोफत मोजणी, शेतरस्त्यांची इतर हक्कात नोंद करणे, १२ फुटांचा शेतरस्ता या मागण्या पूर्ण लवकरच दगडी नंबरी लावणे, शेतरस्ता सपाटीकरण करण्यासाह शेतरस्त्यांच्या मजबुतीकरणाचे आदेश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा, विविध गावांमध्ये रोड मॉडेल व्हिलेजच्या माध्यमातून गावोगावी रोड मॉडेल व्हिलेजच्या माध्यमातून स्मार्ट व्हिलेज करण्यासाठी पाठपुरावा करत राज्यभर मेळावे सुरू करून सामाजिक बांधिलकी जबाबदारी जपल्यामुळे सामाजिक कार्यकर्ते शरद पवळेंना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत शिवशाही न्युज चॅनलच्या वतीने श्री क्षेत्र पंढरपूर येथे राज्यस्तरीय शिवशाही पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे.

३०/०७/२०२५ जुलै रोजी श्री क्षेत्र पंढरपुर येथे शिवशाही न्युजच्या तिसऱ्या वर्धापनदिनी मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात येणार.

हिवरे मधे संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी सोहळा संपन्न



आंबेगाव प्रतिनिधी -

हिवरे (ता.शिरुर) येथील संत सावता महाराज मंदिरामध्ये संजिवन समाधी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला, सर्व कार्यक्रमांचे आयोजन संत सावता महाराज युवा प्रतिष्ठान व अध्यक्ष श्री विकास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व अध्यक्षतेखाली करण्यात आले होते, ह.भ.प.कबीर महाराज आत्तार यांच्या कीर्तनाने सर्व वातावरण भक्तिमय होऊन गेले, तसेच श्री.विकास गायकवाड यांच्या सौजन्याने सतत विठुरायाची पायी वारी करणाऱ्या जेष्ठ वारकरी जोडप्यास पुर्ण पोशाख व सन्मानचिन्ह देऊन संत सावता महाराज वारकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, भक्तिमय वातावरणात सर्व हरी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला, सभापती सुभाष उमाप यांनी मनोगत व्यक्त करताना विकासनाना हे कायमच समाजउपयोगी उपक्रम करत असतात हे इतर नेत्यांच्या मनात पटकन येत नाही पण विकासनाना सतत समाजसेवा करण्यासाठी अग्रेसर असतात असेच कौतुक सभापती शंकर जांभळकर यांनी व उपस्थित नागरिकांनी सुद्धा केले, गावचे आजी माजी पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते, त्यानंतर आभाराने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमासाठी परिसरातील सर्व भाविक भक्त हजर होते.

श्रावणी गर्ल्स स्कॉलरशिप २०२५ शिक्षणासाठीचा एक प्रकाशपुंज



रांजणगाव गणपती प्रतिनिधी :बाळासाहेब कुंभार

रांजणगाव गणपती (ता .शिरूर जि. पुणे) शनिवार दि. १९ जुलै २०२५ रोजी

हीलिंग लाइव्हस संस्थेच्या वतीने आयोजित 'श्रावणी गर्ल्स स्कॉलरशिप २०२५' या उपक्रमाचा उद्घाटन सोहळा रांजणगाव गणपती येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत २० जिद्दी, अभ्यासू व सामाजिक दृष्टिकोन असलेल्या मुलींची निवड करून त्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन, विद्यार्थिनींची निवड, नियोजन व मार्गदर्शन यामध्ये मेजर संतोष सांबारे व संतोष झंजाड यांचे विशेष योगदान राहिले. त्यांनी कार्यक्रमात प्रभावी भाषण करत उपस्थितांना प्रेरणा दिली.

हीलिंग लाइफ संस्थेच्या संस्थापिका जानी विश्वनाथन यांनी या सर्व मुलींच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. यासोबतच विद्यार्थिनींना पुमा ब्रँडचे शूज, मिल्टॉन वॉटर बॉटल आणि इतर दर्जेदार शालेय साहित्याचे किट्स प्रदान करण्यात आले.

मंचावर डॉ. तुषार पाचुंदकर, विजय पाचंगे, संतोष शेवाळे आणि सुनील पडवळ यांची मान्यवर उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात डॉ. भारती पडवळ यांनी उपस्थित विद्यार्थिनींना प्रेरणादायी मार्गदर्शन दिले, तर उत्साही सूत्रसंचालनाची भूमिका डॉ. निकिता सुभाष तळेकर यांनी यशस्वीपणे पार पाडली.

स्वप्निल फलके आणि पूजा साबारे यांनी पाहुण्यांचे उत्कृष्ट स्वागत केले.

संस्थेच्या संस्थापिका जानी दीदी (जानी विश्वनाथन) यांनी भावनात्मक आणि सुंदर ऑडिओ संदेशाद्वारे सर्वांशी संवाद साधला.

रश्मी दीदी, संस्थेच्या सचिव विशेषतः दुबईहून कार्यक्रमासाठी उपस्थित राहिल्या हे देखील एक महत्त्वाचे आकर्षण ठरले.

पाठीमागील ४५ दिवसांपासून संस्थेने पुणे जिल्हा आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील गरजू आणि गुणवंत अशा ५०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. यामध्ये प्रामुख्याने बाबासाहेब झावरे, दिपाली आढाव, संतोष झंजाड, संतोष वाळके, ऊषाताई वाखारे, उज्वलाताई इचके यांनी अथांग परिश्रम घेतले.

श्रावणी गर्ल्स स्कॉलरशिप उपक्रम म्हणजे केवळ शैक्षणिक मदतीपुरता मर्यादित नसून समाजात सकारात्मक बदल घडवणाऱ्या मुलींच्या पाठीशी उभे राहण्याची एक सशक्त चळवळ आहे.

हीलिंग लाईव्हस स्कूल ड्राईव्ह ही कोहकडी ता. पारनेर ,जि.अहिल्यानगर येथे सुध्दा कार्यरत आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त रांजणगाव गणपती येथे महारक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन



शिरुर तालुका प्रतिनिधी विवेकानंद फंड

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी बेट तालुकाध्यक्ष सौ. संयोगिता पलांडे यांच्या नेतृत्वाखाली रांजणगाव येथील महागणपती मंदिरात महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात नागरिकांनी सहभागी होऊन रक्तदान करीत रक्तदात्यांनी ऊस्फुर्त प्रतिसाद दिला. याप्रसंगी भाज?पा जिल्हाध्यक्ष प्रदीपदादा कंद, कामगार आघाडी प्रदे?शध्यक्ष गणेश ताठे, प्रदेशसचिव तुळशीदास दुंडे, मा. अध्यक्ष भगवानराव शेळके, जिल्हा महामंत्री श्रीकृष्ण देशमुख, तालुकाध्यक्ष जयेशदादा शिंदे, तालुका महामंत्री अमोल बोऱ्हाडे ,विद्यार्थी जिल्हाध्यक्ष हर्षद जाधव, उद्योग आघाडीचे प्रदे?शउपाध्यक्ष संजय पांचगे, बजरंग दलाचे प्रमुख नानासाहेब लांडे, ग्रा.पं सदस्य नाना टाकळकर, कोषाध्यक्ष अक्षय गलांडे, रोहित खैरे, संजय फंड, प्रशांत पाचुंदकर, सचिन कुटे, सारंग देवरणकर, अतिश तोडकर, वक्रतुंड फ्रेंड सर्कल आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाहिले जाते. त्यांचा वाढदिवस सेवा दिन म्हणून साजरा करून गरजूंना रक्ताच्या स्वरुपात मदत करणे हा या मागचा हेतू होता. 'रक्तदान सर्वश्रेष्ठ दान' या भावनेतून होणारा हा उपक्रम भाजप कार्यकर्त्यांनी सहभागी होऊन ४५ बाटल्या रक्तदान केले. या शिबिरात रक्तदात्यास पाणी पिण्याची बाटली भेट देण्यात आली .

या कार्यक्रमाचे आयोजन शिरूर बेटचे महामंत्री अमोल बोऱ्हाडे पाटील व विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष हर्षद जाधव यांनी केले होते.

जलजीवन मिशन अंतर्गत योजनांची प्रलंबित कामे येत्या १५ दिवसात पूर्ण करा : महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर जिल्ह्यातील जलजीवन मिशनचा घेतला आढावा



नागपूर, दिलीप येवले

जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत योजनांची प्रलंबित कामे १० ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज अधिकाऱ्यांना दिले. जल जीवन अंतर्गत १३०२ योजनांची सर्व कामे गुणवत्तापूर्णरित्या करावीत असेही त्यांनी सांगितले.

नियोजन भवन येथे पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर जिल्ह्यातील जल जीवन मिशनच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या. याप्रसंगी वित्त व नियोजन राज्यमंत्री ?ड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार विकास ठाकरे आणि संजय मेश्राम, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे आदी उपस्थित होते.

जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात सुरु असलेल्या विविध योजनांची माहिती श्री. बावनकुळे यांनी यावेळी जाणून घेतली. या मिशन अंतर्गत येणाऱ्या योजना व यातील अपूर्ण योजनांच्या खर्चाचा नव्याने आराखडा तयार करावा, निधी प्राप्त झाल्यावर पुन्हा खर्चाचा आराखडा तयार करुन निविदा काढाव्यात. एका कंत्राटदाराला दोन पेक्षा जास्त कामे देण्यात येऊ नये आदी सूचना करुन ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्यांनी येत्या १५ दिवसात प्रलंबित सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

जलजीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यातील एकुण १३ तालुक्यात समाविष्ट १३०२ योजना व यातील योजनांची पूर्ण झालेली कामे, प्रगतीपथावर असलेल्या योजना तसेच ग्रामपंचायतींकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या योजना, प्रलंबित असलेली नळ जोडणीची कामे आणि केंद्र व राज्य शासनाकडून जलजीवन मिशन अंतर्गत करावयाच्या कामांसाठी आवश्यक निधी आदींबाबत जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक धोंगे यांनी सादरीकरण केले.

जिल्ह्यातील पाणी टंचाई कृती आराखडयातील आतापर्यंत हाती घेण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती श्री. बावनकुळे यांनी यावेळी जाणून घेतली. ज्या गावांमध्ये पाण्यांचे स्त्रोत कोरडे झाले आहेत तिथे बंधारा बांधून पाणी अडवणे, जल पुनर्भरणाची कामे हाती घेणे व अशा गावांमध्ये १५ लाखांच्या मर्यादेतील कामे तातडीने करण्याचे निर्देशही श्री. बावनकुळे यांनी यावेळी दिले. महावितरण कंपनीकडून पाणी पुरवठा योजनांसाठी आवश्यक वीज जोडणीच्या प्रलंबित प्रकरणांचा आढावाही यावेळी घेण्यात आला. महावितरणकडून शहरी आणि ग्रामीण भागात उभारावयाची अतिरिक्त रोहित्रे, वीज वितरणाबाबत करावयाचे व्यवस्थापन आदींविषयी श्री. बावनकुळे यांनी यावेळी यंत्रणांना सूचना केल्या. तसेच गावोगावांमध्ये जाऊन जनतेशी संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी नियोजन करुन त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देशही त्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले.

धोत्रा पेट्रोल पंप जवळ बस व ट्रेलर मध्ये अपघात अपघातामध्ये बस चालक गंभीर जखमी



गौळ (प्रतिनिधी)

हिंगणघाट रस्त्यावरील धोत्रा पेट्रोल पंप वर ट्रेलर 'पेट्रोल पंप वर पेट्रोल भरून ट्रेलर रस्त्या ओलांडताना वर्धेवरून हिंगणघाट कडे बस जात असलेली बस ट्रेलर चा भीषण अपघात झाल्याची घटना उघडकीस आली आहे .

या अपघातामध्ये बस चालक गंभीर जखमी झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. तसेच बसमधील काही प्रवासी सुद्धा गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. ट्रेलर चालक रस्ता ओलांडत असतांना मागे न बघताच हायवे रोड कडे पेट्रोल पंप वरून पेट्रोल भरून ट्रेलर काढला वर्धेवरून धोत्र या मार्गाने हिंगणघाट कडे जात असलली बस या ट्रेलरवर आदळली

या घटनेची माहिती पोलीस सहाय्यक निरीक्षक विजय घुले यांना मिळताच त्यांनी टीम सह घटनास्थळी जाऊन जखमी झालेल्या प्रवासांना बाहेर काढून उपचाराकरता वर्धा येथे रवाना केली आहे .

पुढील तपास अल्लीपूर येथील पोलीस सायक निरीक्षक विजय घुले करीत आहे. वृत्त लिहेपर्यन्त पंचनामा सुरू होता.

कारगिल विजय दिवस - शौर्य आणि बलिदानाची अमरगाथा प्रहार मिलिटरी स्कूलमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन



नागपूर, दिलीप येवलेः-

प्रहार मिलिटरी स्कूल, रविनगर येथे कारगिल विजय दिवस मोठ्या उत्साहात, देशभक्तीच्या स्फुरणदायक वातावरणात साजरा करण्यात आला. २६ जुलै १९९९ या दिवशी भारतीय जवानांनी प्रतिकूल परिस्थितीत प्राणांची आहुती देत कारगिलमध्ये विजय मिळवला, त्या पराक्रमाच्या सन्मानार्थ दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो.

कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत मंगलमय वातावरणात 'भारत माता पूजन' करून झाली. यानंतर 'अमर जवान' स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून वीर शहिदांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

या वर्षीच्या कारगिल विजय दिनाचे वैशिष्ट्य म्हणजे कारगिल युद्धात थेट सहभागी झालेले शौर्यवंत ब्रिगेडियर सुनील गावपांडे (निवृत्त) यांची उपस्थिती. त्यांनी आपल्या अनुभवातून युद्धातील प्रसंग विद्यार्थ्यांसमोर अत्यंत हृदयस्पर्शी शैलीत कथन केले. त्यांच्या बोलण्यातून भारतीय जवानांचे शौर्य, चिकाटी, आणि मातृभूमीप्रेमाचे दर्शन घडले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लेफ्टनंट सीडीआर (डॉ.) विक्रांत मल्हान, तसेच सी.पी अँड बेरार एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अँडव्होकेट अशोक बन्सोड, श्री भालचंद्र कागभट (उपाध्यक्ष), श्री विजय कागभट (सचिव), एअर फोर्सचे ग्रुप कॅप्टन श्रीराम बढे, आणि शाळेच्या प्राचार्या श्रीमती वंदना कुलकर्णी यांचीही मान्यवर उपस्थिती लाभली.

कारगिल विजय सप्ताह अंतर्गत संपूर्ण आठवडाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये -कारगिल विजयावर आधारित कविता सादरीकरण,प्रश्नमंजुषा स्पर्धा,साइटेशन लेखन, 'ऑपरेशन सिंदूर', स्लाईड शो इत्यादींचा समावेश होता.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांनी सभागृह भारावून गेले. त्यानंतर केलेल्या देशभक्तीपर नृत्य, योगा प्रात्यक्षिक, व तलवारबाजी यांच्या जोरदार सादरीकरणाने प्रेक्षकांमध्ये स्फुरण निर्माण झाले. टाळ्यांचा कडकडाट आणि जयघोषाने सभागृह दणाणून गेले.

या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम जागवणे, लष्करी सेवेची प्रेरणा देणे, आणि वीर जवानांच्या बलिदानाचे स्मरण करून त्यांना आदरांजली अर्पण करणे हे होते - जे प्रभावीपणे साध्य झाले.

कार्यक्रमाचे उत्तम संचालन शाळेच्या शिक्षिका श्रीमती शोमा पाल यांनी केले. कार्यक्रमाची सांगता सर्व उपस्थितांनी उभे राहून राष्ट्रगीत गात अत्यंत गौरवपूर्ण पद्धतीने करण्यात आली.

सी.पी अँड बेरार एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांचे प्राचार्य, शिक्षकवृंद आणि कर्मचारी यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून वीर जवानांप्रती कृतज्ञता आणि अभिमान व्यक्त केला.

राजकारणात एका नेत्यामध्ये जी नम्रता असायला हवी ती श्री नितीन गडकरीजी - इम्रान प्रतापगढी



नागपूर दिलीप येवले

हजरत बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या १०३ व्या वार्षिक उर्सनिमित्त ताजबाग शरीफ येथे भव्य अखिल भारतीय मुशायरा आयोजित करण्यात आला होता. देशातील प्रसिद्ध आणि प्रसिद्ध कवींनी त्यात भाग घेतला. या मुशायरामधील मुख्य आकर्षण प्रसिद्ध कवी आणि राज्यसभा खासदार इम्रान प्रतापगढी होते. त्यांनी त्यांच्या सुंदर शैलीत एकामागून एक ओळी सादर केल्या. इम्रान प्रतापगढी यांच्या कविता ऐकण्यासाठी लोकांची गर्दी जमली. इम्रान प्रतापगढी यांनी स्टेजवर माइक घेताच लोकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. इम्रान प्रतापगढी यांनी त्यांच्या अनेक कविता आणि गझलांनी वातावरण तयार केले. रचना वाचण्यापूर्वी ते म्हणाले की, अलाहाबाद ही अशी भूमी आहे जिथे गंगा आणि यमुनेचा संगम होतो, नद्यांचा संगम होतो, परंतु जर संस्कृती, धर्म, साहित्याचा संगम पहायचा असेल तर आज ते नागपूरच्या भूमीवर दिसत आहे. 'शायरी म्हणत असताना त्यांनी सांगितले की ही वीर शिवजी, बाबासाहेब आंबेडकरांची भूमी आहे, या मातीला बाबा ताजुद्दीन यांच्या वसाहतीचा सुगंध आहे, ही माती इच्छा आणि श्रद्धेचे पीक घेईल', यावर लोक नाचले. इम्रान प्रतापगढी म्हणाले की, साहित्यिक व्यासपीठावर तुम्हा सर्वांकडून मिळालेले प्रेम आणि आशीर्वाद मला देशाच्या संसदेत घेऊन आले आहेत. त्यांनी विश्वास व्यक्त केला की ते राजकारणात नक्कीच आले आहेत, परंतु ज्या पद्धतीने ते साहित्यिक व्यासपीठावरून सामान्य माणसाचा आवाज उठवत आहेत, ते कधीही दडपू देणार नाहीत. भविष्यातही ते निश्चितच समाजाच्या वेदना पूर्ण ताकदीने मांडतील. इम्रान प्रतापगढी म्हणाले की, जेव्हा ते येथे येत होते तेव्हा श्री. प्यारे खान यांनी त्यांना सांगितले की, दोन-तीन दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी देखील येथे आले होते. इम्रान प्रतापगढी म्हणाले की, मी त्यांना सलाम करतो. या काळात राजकारणात सत्ताधारी पक्षाच्या कोणत्याही नेत्यामध्ये सर्वात सुंदरपणे दिसणारी नम्रता, शालीनता, साधेपणा नितीन गडकरीजींमध्ये आहे. मी त्यांचे मनापासून कौतुक करतो. त्याचप्रमाणे मुशायरात प्रसिद्ध कवी मशहर आफ्रिदी, आरिफ सैफई, शाइस्ता सना, मनिका दुबे, जुनेद अख्तर, बिलाल सहारनपुरी, हमीद भुसावळी, समीर कबीर यांनीही आपल्या सुंदर काव्याने दीपप्रज्वलन केले. प्रसिद्ध कवी नदीम फारुख यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. यावेळी हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे झिया खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकार, विश्वस्त हाजी फारुखभाई बावला, गजेंद्रपाल सिंग लोहिया, मुस्तफा भाई टोपीवाला, इम्रान खान व रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे, माजी आमदार मिर्झा मिरजा, माजी आमदार डॉ. मुशायराच्या मंचावर हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टतर्फे श्री. इम्रान प्रतापगढ़ी यांच्यासह सर्व कवींना पगडी घालण्यात आली होती. सर्वांचा स्मृतीचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

वर्षवास निमित्त ड्रॅगन पॅलेस येथे विशेष बुध्द वंदना व धम्मदेसनाच्या कार्यक्रमाचे आयोजन; बँगलोर येथील पुज्य भंतेजी आंनदा थेरो देतील धम्मदेसना



कामठी दिलीप येवलेः-

विश्वविख्यात ड्रॅगन पॅलेस येथे दि. २७/०७/२०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता पुज्य भंतेजी आंनदा थेरो, जनरल सेक्रेटरी, महाबोधी सोसायटी बैंगलोर तथा उपाध्यक्ष, आंतरराष्ट्रीय बुध्दिस्ट महासंघ (सांस्कृतिक मंत्रालय) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये विशेष बुध्द वंदना संपन्न होणार आहे या प्रसंगी पुज्य भंतेजी उपासक उपासिकांना धम्मदेसना देतील. त्यानंतर मा. ?ड. सुलेखाताई कुंभारे यांच्या वतीने पुज्य भंतेजीना धम्मदान व भोजनदान देण्यात येईल.

विपस्सना मेडीटेशन सेंटर येथील १० दिवसीय ध्यान शिबीराचे समापन मंगलमैत्रीने दि. २६/०७/२०२५ रोजी झालेले आहे. या निमित्ताने ज्या साधकांनी या १० दिवसीय शिबीरामध्ये सहभाग घेतला त्यांची विशेष उपस्थिती धम्मदेसनेच्या कार्यक्रमात राहणार आहे तरी सर्व उपासक उपासिकांना विनंती करण्यात येत आहे की, वर्षवास निमित्त आयोजित या धम्मकार्यक्रमात उपस्थित राहून धम्मलाभ घ्यावा असे आव्हान ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या प्रमुख ?ड. सुलेखाताई कुंभारे यांनी केले आहे

सणोत्सव काळात जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणांनी सज्ज रहावे :महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



नागपूर, दिलीप येवले

येत्या काळात जिल्ह्यात साजऱ्या होणाऱ्या सण, उत्सव व यात्रा प्रसंगी कायदा-सुव्यवस्था व शांतता कायम राखण्यासाठी शहर व ग्रामीण पोलीस यंत्रणांना सज्ज राहण्याच्या सूचना आज महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.

पोलीस आयुक्त कार्यालयात पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली शहर व ग्रामीण पोलीस विभागाची आगामी सण उत्सव व यात्रांच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक झाली. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या. पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, अपर पोलीस आयुक्त सर्वश्री वसंत परदेशी, शिवाजी राठोड, राजेंद्र दाभाडे, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

येत्या काळात नागपंचमी उत्सव, नारळी पोर्णिमा, रक्षाबंधन, स्वातंत्र्य दिन, कृष्ण जन्माष्टमी, दहीहंडी उत्सव, बैलपोळा, तान्हापोळा, मारबत मिरवणूक उत्सव, गणेशोत्सव आदी सणोत्सव नागपूर शहरात शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस उपायुक्तांनी परिमंडळानुसार शांतता समितीच्या बैठका आयोजित कराव्या. तसेच शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक सर्व उपाय करण्याच्या सूचना श्री. बावनकुळे यांनी यावेळी दिल्या. शहर पोलिसांना आवश्यक अद्ययावत साधन सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल, कामठी येथील पोलीस भवनासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयात पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आगामी सण उत्सव व यात्रेच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक पार पडली. विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, पोलीस उपायुक्त सर्वश्री अनिल म्हस्कर, दीपक अग्रवाल, वृष्टी जैन, विजय माहुलकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील ग्रामीण भागात आगामी सणोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस विभागाने केलेल्या नियोजनाची माहिती यावेळी श्री. पोद्दार यांनी दिली. तसेच विभागाकडून राबविण्यात येत असलेला झिरो फॅटॅलिटी प्रोग्राम आणि याअंतर्गत माहिती विश्लेषणासह गुन्हे तपासात आलेली सुकरता, एआयचा करण्यात येत असलेला प्रभावी उपयोग आदींची माहितीही त्यांनी दिली. ग्रामीण भागात अवैध लॉटरी, अवैध वाळू व्यवहार आदींना प्रतिबंध घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश श्री. बावनकुळे यांनी यावेळी दिले. पोलीस स्टेशन परिसरात वृक्ष लागवड करण्याच्या तसेच पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, पोलीस उपायुक्त आणि पोलीस निरीक्षकांनी वेळोवेळी ग्राम भेटींच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधण्याच्या सूचनाही केल्या.

तत्पूर्वी, महिला व बालकांच्या लैंगिक शोषणा विरोधी आणि मानवी तस्करी विरोधात नागपूर शहर पोलिसांच्या ऑपरेशन शक्ती आणि शक्ती हेल्प डेस्कचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले.

विविध मागण्यासह महाराष्ट्र ग्रामीण बँक अधिकारी व कर्मचारी संघटनेचे भव्य आंदोलन



नागपूर दिलीप येवलेः-

(संलग्नः भारतीय मजदुर संघ, ऑल इंडिया ग्रामीण बँक वर्कर ऑर्गनायझेशन व ऑल इंडिया ग्रामीण बँक ऑफिसर ऑर्गनायझेशन यांनी ठरवलेल्या ३ऱ्या टप्प्यातील आंदोलन, २५ जुलै २०२५ रोजी मुख्य कार्यालय महाराष्ट्र ग्रामीण बँक येथे प्रमुख मागण्यासाठी आंदोलनामध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सहभागी झाले होते.

कामगार एकजुटीचा विजय असो' या उक्तीचा आपण आंदोलन स्थळी संघटने प्रति एकनिष्ठा व सभासद एकजुटीचे प्रदर्शन सर्वांनाच दाखवून दिले. यामध्ये नारी शक्तीची उपस्थिती ही विशेष महत्वाची होती. या आंदोलनात मांडलेल्या प्रमुख मागण्याचे निवेदन केंद्रीय अर्थमंत्री, वित्तीय सेवा विभाग, वित्त विभाग, भारत सरकार यांना श्रृँ मुख्य कार्यालय यांच्या मार्फत देण्यात आले.

या आंदोलनात सभासदांनी महिलांच्या समस्या, मुद्द्यावरती पुन्हा एकदा प्रकाश टाकला व संघटनेने त्या लवकर पूर्ण करण्याचे मान्य केले आहे.

२५ जुलै रोजी झालेल्या आंदोलनादरम्यान, आपल्या संघटनेने ११ महत्त्वाच्या मागण्या बँक व्यवस्थापन व अर्थमंत्र्यांकडे सादर केल्या आहेत.

या मागण्या तातडीने मान्य केल्या नाहीत तर, येत्या २२ ऑगस्ट रोजी मोठे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

प्रमुख ११ मागण्या खालील प्रमाणे आहेत.

१. आयपीओला नाही - ग्रामीण आणि सार्वजनिक स्वरूपाच्या ग्रामीण बँकांचे संरक्षण करावे.

२. ट्रान्सफर पॉलिसीतील त्रुटी दुरुस्त कराव्यात.

३. व्यापारी बँकांप्रमाणे भत्ते व सेवा अटींमध्ये पूर्ण समानता द्यावी.

४. १२व्या वेतन करार आणि ९व्या संयुक्त नोटची संपूर्ण अंमलबजावणी करावी.

५. पुरेसे कर्मचारी भरती करावेत आणि न्याय्य बढती नियम लागू करावेत.

६. राज्यस्तरीय कार्यक्षेत्र असलेली राष्ट्रीय ग्रामीण बँक स्थापन करावी.

७. तात्पुरत्या कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करून शोषण थांबवावे.

८. बँकेने कर्मचारी लाभांचा खर्च उचलावा.

९. ग्रामीण बँकांच्या संघटनांचा आयबीएचर्चामध्ये समावेश करावा.

१०. जुनी पेन्शन योजना पुनर्संचयित करावी.

११.५ दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करावा.

अशा विविध मागण्यांचे निवेदन ग्रामीण बँक भारतीय मंजदूर संघा चीफ जनरल मॅनेजर (सी जी एम) कावेरी, भामरे, मोरे यांना देण्यात आले. त्यावेळी श्रमिक गीत योगेंद्र चटप, दिनेश बाहेती यांनी गायले आणि उपस्थितांना प्रोत्साहित केले.

सूत्र संचालन अमोल चव्हाण यांनी केले त्यावेळी त्यावेळी महेश मगर, अश्विन तिरपुडे, सय्यद मुज़ीब, अनिकेत दुबे, रुदल मस्के, योगेश पालीवाल यांनी मनोगत व्यक्त केले.

प्राथमिक आरोग्य केंद्र जळगाव यांची डेंगू व इतर आजारावर जनजागृती



आष्टी तालुका प्रतिनिधी शरद शेंद्रे

प्राथमिक आरोग्य केंद्र जळगाव यांच्या वतीने उपकेंद्र नांदपूर येथे मा.वैद्यकीय अधिकारी तथा अतिरिक्त तालुका आरोग्य अधिकारी मा.डॉ. नीलेंद्र वर्मा सर यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधिकारी मा.डॉ. सौदामिनी हरडे मॅडम यांच्या सूचनेनुसार मॉडेल हायस्कूल नांदूर येथे प्रोजेक्टरच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना हिवताप, डेंगू, चिकनगुनिया व कीटकजन्य विषयी माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.

डेंगू प्रतिरोध महिना 'जुलै-२०२५' कार्यक्रमानुसार शाळेत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय कीटकजन्य आजार व साथरोग विषयी जनजागृती करून आरोग्य शिक्षण देण्यात आले, पाण्याचे नमुने, तपासून व्यक्तिगत स्वच्छता, डासाचे जीवन चक्र, गप्पी मासे चे महत्व, इत्यादी विषयी महत्त्वाची माहिती देण्यात आली

यावेळी उपस्थित जे.आर. चव्हाण(आरोग्य निरीक्षक), वर्गशिक्षक, आरोग्य सेवक पडिशाला, आरोग्य सेविका भोळे सिस्टर हजर होते.

राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान क्षेत्र परिसरातील वाहतूक कोंडी तातडीने सोडवा : उपमुख्यमंत्री अजित पवार

वृत्तसंस्था/पुणे

राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान क्षेत्र (आयटी पार्क) हिंजवडी परिसरासह माण, म्हाळुंगे, सूस आदी भागातील वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने कराव्यात, मेट्रोची सुरु असलेली कामे गतीने पूर्ण करावीत, विविध विकास कामे व रस्त्याची कामे करताना स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिकांना विश्वासात घेऊन वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावा, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.



आकुर्डी येथील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालय येथे आयोजित बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले. यावेळी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार शंकर मांडेकर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी चिंचवड शहरचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त योगेश म्हसे, अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, पुणे महानगर पालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी चिंचवड अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) अतिरिक्त मुख्याधिकारी विजय राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, या भागातील वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता दूरगामी विचार करून रस्त्यांचे रुंदीकरण करणे गरजेचे आहे. रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासह भूसंपादनाची कामे गतीने पूर्ण करावीत. रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावे. नाले, ओढ्याच्या काठावरील अतिक्रमण काढण्यासह राडारोडा काढून नैसर्गिक पाण्याचे प्रवाह मोकळे करावे. कामात अडथळा आणणाऱ्यावर पोलिसांनी कारवाई करावी.

नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा विचार करता येत्या काळात त्यांना पायाभूत सुविधा मिळण्याच्यादृष्टीने सर्व संबंधित यंत्रणेने समन्वयाने काम करावे. सद्यस्थितीत रस्त्याच्या दोन्ही बाजुच्याकडेला तसेच अंडरपासखाली वाहने थांबणार नाही, तसेच जड आणि अवजड वाहतुकीचे नियोजन करावे. वाहतूक कोंडीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उपाययोजना अमंलबजावणीकरिता नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे.

वाढत्या नागरीकरणाचा विचार करुन रस्ते, पाणी, रुग्णालये, शाळा, मलनिस्सारण प्रकल्प, कचरा, वाहतूक, प्रदूषण आदी बाबींचा शहर नियोजन आराखड्यात समावेश करावा. कासारसाई कालवा बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावरील शिक्के कमी करण्यात येतील, मंत्रालय स्तरावरील मंजुरी प्रस्तावाबाबत संबंधित विभागाचे मंत्री, सचिव आदींसोबत बैठक घेऊन त्यामध्ये सकारात्मक मार्ग काढण्यात येईल, असेही श्री. पवार म्हणाले.

आगामी काळातील पुण्याची लोकसंख्या आणि दळणवळणाच्या सुविधांचा विचार करून पुणे महानगर क्षेत्र, हिंजवडीसह औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारणीवर भर देणे गरजेचे आहे. पीएमआरडीएने मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे काढल्यामुळे हिंजवडीसह परिसरातील वाहतूक कोंडी दूर होत आहे, त्याच प्रमाणे सर्व संबंधित विभागाने देखील अतिक्रमणासंदर्भात ठोस भूमिका घेऊन वाहतूक कोंडी दूर करण्याचे निर्देश श्री. पवार यांनी दिले.

हिंजवडी भागात विविध विकास कामांची पाहणी या बैठकीपूर्वी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी पुणे मेट्रो लाईन ३, स्थानक क्र. ६, क्रोमा, हिंजवडी, क्रोमा ते मेझानाईन ते लक्ष्मी चौक ते शिंदे वस्ती ते मारुंजी रोड, मारुंजी रोड - कासार साई (कॅनॉल) विप्रो सर्कल फेज-२, विप्रो सर्कल फेज-२ - स्थानक क्र. ०३, डोहलर कंपनी, डोहलर कंपनी हिंजवडी फेज ३ माण गाव-पांडवनगर नगररचना रस्ता, नगररचना रस्ता ते प्राधिकरण आकुर्डी कार्यालयादरम्यान वाहतूक कोंडी सोडविण्याच्यादृष्टीने करण्यात येणाऱ्या उपाययोजना आणि सुरु असलेल्या विविध विकासकामाची पाहणी करुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

बैठकीत श्री. मांडेकर यांनी वाहतूक कोंडी सोडवण्याच्यादृष्टीने सूचना केल्या.

पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. म्हसे यांनी १३ जुलै रोजीच्या बैठकीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती दिली. हिंजवडी आयटी पार्क परिसरात पीएमआरडीएमार्फत विकसित करण्यात येणारे रस्ते, पीएमआर क्षेत्राकरिता पाणी आरक्षण, इंद्रायणी व पवना नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्प, प्राधिकरण क्षेत्रातील नागरी विकास केंद्र गावांमध्ये मल निस्सारण प्रकल्प आदींबाबत पीपीटीद्वारे सादरीकरण केले.

यावेळी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे आयटी सिटी, मेट्रो रेल लि. यांच्यासह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

विभागांनी अनुकंपा नियुक्तीची कारवाई कालमर्यादेत करावी : पालकमंत्री संजय राठोड

अनुकंपा भरतीचा १५० दिवस विशेष मोहिमेत समावेश
भरतीच्या अनुषंगाने नियुक्ती प्राधिकाऱ्यांची बैठक

वृत्तसंस्था/यवतमाळ

राज्य शासनाने १५० दिवसांच्या विशेष कार्यक्रमांतर्गत अनुकंपा नियुक्तीची कालमर्यादा निश्चित करून दिली आहे. विभागांनी या मर्यादेत अनुकंपा पदे निश्चित करून वेळेत पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश पालकमंत्री संजय राठोड यांनी सर्व विभागांना दिले आहे.

राज्य शासनाच्या १५० दिवस विशेष कार्यक्रमांतर्गत अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र असलेल्या सर्व उमेदवारांना कालमर्यादेत नियुक्ती आदेश देण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यात जास्तीत जास्त अनुकंपा उमेदवारांना नियुक्ती देण्यासाठी आवश्यक कार्यवाही वेळेत करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या आहे.

अनुकंपा नियुक्तीसाठी शासनाने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार अनुकंपा उमेदवारांची प्रतिक्षा सूची अद्ययावत करणे, उमेदवारांच्या विनंतीनुसार गट बदलण्याची कार्यवाही, अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध रिक्त पदांची परिगणना, गट ड मध्ये अनुकंपा नियुक्तीसाठी पदे पुनर्जिवित करण्याचे प्रस्ताव सादर करावयाचे आहे. ही सर्व प्रक्रिया दि. १५ ऑगस्ट पर्यंत पुर्ण करावयाची आहे. दि. १८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी याबाबत बैठक घेऊन अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध पदे व नियुक्तीच्या अनुषंगाने माहिती घेणार आहे.

त्यानंतर जिल्ह्याची गट क ची सामायिक प्रतिक्षासूची अद्ययावत केली जातील. तसेच नियुक्तीस उपलब्ध पदसंख्या प्रसिद्ध करण्यात येतील. नियुक्त प्राधिकाऱ्याच्या यादीप्रमाणे गट ड च्या पदावर नियुक्तीसाठी सिफारस केली जाईल. जिल्हाधिकाऱ्यांच्या सिफारसीनुसार गट ड ची मृत करण्यात आलेली पदे नियुक्ती देण्यासाठी पुनर्जीवित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतील. ही प्रक्रिया दि. २२ ऑगस्ट पुर्वी पुर्ण करण्यात येणार आहे.

अनुकंपा उमेदवारांचा दि. १ सप्टेंबर रोजी मेळावा घेण्यात येणार आहे. त्यात उमेदवारांची नियुक्तीसाठी सिफारस करण्यात येतील. त्यापुर्वी विभागाच्यावतीने गट ड ची मृत पदे पुनर्जीवित करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येणार आहे. दि. १५ सप्टेंबर रोजी गट क च्या व पुनर्जीवित केल्या गट ड च्या सिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येणार आहे.

याप्रमाणे शासनाने निर्धारीत केल्याप्रमाणे विभागाने कारवाई करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडून अनुकंपा भरतीचा आढावा

शासनाने अनुकंपा नियुक्तीसाठी निर्धारीत केलेला कालबद्ध कार्यक्रम व पालकमंत्री संजय राठोड यांच्या निर्देशान्वये प्रभारी जिल्हाधिकारी अनिल खंडागळे यांनी सर्व नियुक्ती प्राधिकारी तथा विभाग प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी अनिरूद्ध बक्षी, पालकमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी मोहन जोशी उपस्थित होते. शासनाने जो कालबद्ध कार्यक्रम दिला आहे. त्याप्रमाणे कारवाई करून पुढील बैठकीत आपल्या विभागाची माहिती सादर करण्याच्या सूचना श्री. खंडागळे यांनी केल्या.

अनेक वर्षांपासून अतिक्रमित शीवरस्ता खुला: विभागीय आयुक्तांकडून सरपंचांचे कौतुक

वृत्तसंस्था/सांगली

सांगली जिल्ह्यातील आळते (ता. तासगाव) आणि कार्वे (ता. खानापूर) या दोन गावामधील अनेक वर्षांपासून अतिक्रमित असल्याने बंद असलेला शीवरस्ता विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या पुढाकाराने व दोन्ही गावच्या सरपंचांच्या सहकार्याने खुला करण्यात आला. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी या ठिकाणी भेट देऊन समाधान व्यक्त केले.



आळते आणि कार्वे या दोन गावांच्या हद्दीवरील खानापूर तासगाव रस्त्यापासून सुरू होऊन ओढा पर्यंत जाणारा अंदाजे दोन किलोमीटरचा रस्ता बऱ्याच वर्षापासून बंद होता. यामुळे शेतकऱ्यांना ये-जा करण्यास तसेच शेतामध्ये मोठी अवजारे आणि वाहने नेण्यास अडचणी येत होत्या. या कारणाने त्यांच्या उत्पन्नावरही परिणाम होत होता. या रस्त्याची शासकीय तसेच खाजगी मोजणी होऊन सुद्धा शेतकऱ्यांमध्ये त्या रस्त्याबाबत एकमत होत नव्हते. दोन्ही तालुक्यांच्या हद्दीवरील रस्ता हा या खानापूर व तासगाव या दोन तालुक्यांच्या शीवेवरचा हा रस्ता खुला झाल्याने दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी आळते गावचे सरपंच बालाजी मोहिते आणि कार्वे गावचे सरपंच बाळासो जाधव यांची भेट घेऊन याकामी पुढाकार घेतल्याबद्दल दोघांचे तसेच शेतकऱ्यांचे कौतुक केले. यासोबतच त्यांनी इतर शेतकऱ्यांनीही सामंजस्याची भूमिका घेऊन महसूल प्रशासनाच्या मदतीने अधिकाधिक रस्ते खुले करून घ्यावेत तसेच त्या रस्त्यांची सात बारावर नोंद करून घ्यावी, असे आवाहन केले.

यावेळी विटा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी डॉ. विक्रम बांदल आणि खानापूर - विटा तालुक्याचे तहसीलदार योगेश्वर टोंपे, कार्वे गावच्या शेतकरी तसेच पोलीस पाटील ज्योत्स्ना पाटील, अमित पाटील, रोशन जाधव व आळते गावचे माणिक सूर्यवंशी उपस्थित होते.

जनसंवादाच्या माध्यमातून नागरिकांच्या अडचणी सोडवाव्यात : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

वृत्तसंस्था/मुंबई

महसूल विभागाचे काम गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होण्यासाठी विभागातील अधिकाऱ्यांनी नागरिकांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात. जनसंवाद, लोकशाही दिन आदी माध्यमातून त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.



रायगड जिल्ह्यातील महसूल विभागाशी संबंधित कामांचा आढावा मंत्री श्री. बावनकुळे यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेतला. यावेळी मंत्रालयातील अधिकाऱ्यांसह रायगड जिल्ह्यातील महसूल अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये रायगड जिल्हा प्रशासन मागे राहणार नाही याची दक्षता घ्यावी. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करुन लाभार्थ्यांना घरांसाठी पट्टे उपलब्ध करुन द्यावेत. नवीन वाळू धोरण आणि मार्गदर्शक सूचनांनुसार वाळू उपलब्ध करुन द्यावी. भूमि अभिलेख विभागाच्या आधुनिकीकरणासाठी जिल्हा नियोजनच्या निधीमधून खर्च करण्यात यावा. पाणंद रस्त्यांना क्रमांक देऊन दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात यावी. लोकअदालत सारख्या माध्यमांतून अर्धन्यायिक प्रकरणांच्या सुनावण्या येत्या तीन महिन्यात पूर्ण कराव्यात. याचबरोबर जिवंत सातबारा, तुकडेबंदी, शेतरस्ता, भोगवटादार २ मधून १ मध्ये करण्याची तसेच आकारी पड जमिनीची प्रकरणे, स्वामित्व योजनेचा लाभ देणे आदी कामे देखील कालमर्यादित मार्गी लावावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

रायगड जिल्हाधिकारी तसेच जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांनी यावेळी सुरू असलेल्या विविध कामांचा अहवाल सादर केला.

रुग्णालयांनी गरजू रुग्णांना शासकीय योजनांचा तत्परतेने लाभ द्यावा : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

वृत्तसंस्था/पुणे

धर्मादाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांनी आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांचा गरजू रुग्णांना तत्परतेने लाभ देण्याकरिता पुढाकार घ्यावा, या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत न झालेल्या रुग्णालयानी नोंदणी करुन घ्यावी, याकामी राज्य शासनाच्यावतीने सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.



यशदा येथे आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार कैलास पाटील, आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, राज्य आरोग्य हमी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, आरोग्य उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, जिल्हा शैल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई यांच्यासह रुग्णालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. आबिटकर म्हणाले, आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने अतिशय महत्वाच्या योजना आहे. धर्मादाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत जिल्ह्यात विविध रुग्णालये नोंदणीकृत असून रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना आजारपणाच्या काळात सकारात्मक पद्धतीने मदत करण्याची भावना ठेवावी. त्यांची सेवा करण्याकरिता पुढाकार घेतला पाहिजे.

धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी प्रत्येकी १० टक्के याप्रमाणे एकूण २० टक्के खाटा आरक्षित करणे बंधनकारक असून त्याअनुषंगाने धर्मादाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांनी तत्परतेने काम करावे, शासनाच्या निर्देशाप्रमाणे रुग्णांना खाटा उपलब्ध करुन द्याव्यात.

पुणे जिल्ह्यात रुग्णांची संख्या तसेच वैद्यकीय उपचाराकरिता येणाऱ्या खर्चाचा विचार करता धर्मादाय रुग्णालयाची मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे गरजू रुग्णांना गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, सेवा दिल्यानंतर रुग्णाच्या मनात रुग्णालयाप्रती समाधानाची भावना निर्माण झाली पाहिजे, यादृष्टीने काम करावे, असेही श्री. आबिटकर म्हणाले.

डॉ. शेटे म्हणाले, शासनाच्या आरोग्य विषयक योजनांचा प्रत्येक गरजू रुग्णांना लाभ देण्याकरिता राज्य शासन प्रयत्नशील आहे. त्यामुळे रुग्णालयांनी पात्र रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा देवून सहकार्य करावे, याकामात हलगर्जीपणा होणार नाही, याबाबत रुग्णालय व्यस्थापनाने दक्षता घ्यावी, असेही डॉ. शेटे म्हणाले.

राज्य कामगार विमा रुग्णालयाची पाहणी

पिंपरी-चिंचवड मोहननगर येथील राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयाला आरोग्य मंत्री यांनी भेट देऊन बाहय रुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, औषधी भंडार, आहार कक्षाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. येथील रुग्णांशीही संवाद साधून अडीअडचणी जाणून घेतल्या. रुग्णांना चांगल्या सेवा सुविधा देण्याकरिता डॉक्टर व प्रशासनानी काळजीपूर्वक लक्ष द्यावे व दर्जेदार सेवा द्याव्यात, अशा सूचना श्री. आबीटकर यांनी केल्या.

कर नियमनाच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे देशाच्या विकासाला चालना मिळते: राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

वृत्तसंस्था/मुंबई

देशाच्या प्रगतीसाठी आयकर विभाग देत असलेले योगदान मोठे आहे. कर नियमनाच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे देशाच्या विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.



आयकर विभागाच्या १६६ व्या स्थापना दिनानिमित्त मुंबईतील कौटिल्य भवन येथे आयोजित समारंभात राज्यपाल श्री. राधाकृष्णन बोलत होते. या कार्यक्रमास आयकर अपीलेट ट्रिब्युनलचे उपाध्यक्ष शक्तिजित डे, प्रधान मुख्य आयकर आयुक्त श्रीमती मालती श्रीधरन, विविध कंपन्यांचे वरिष्ठ प्रतिनिधी, आयकर विभागातील वरिष्ठ अधिकारी, सेवानिवृत्त अधिकारी तसेच पुरस्कारप्राप्त क्रीडापटू उपस्थित होते.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले की, २०२५ मध्ये आपण ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करीत आहोत. यापार्श्वभूमीवर कर प्रशासनाने बदलांना सामोरे गेले पाहिजे. आपण नेहमी करदात्यांच्या चुका शोधतो. दंड आकारतो. परिणामी, जास्तीत जास्त लोक करचक्राबाहेर राहण्याचा प्रयत्न करतात. उलटपक्षी करदात्यांशी मैत्रीपूर्ण वागणूक ठेवणे, अधिकाधिक लोकांना कर प्रणालीच्या कक्षेत आणण्यासाठी चार्टर्ड अकाउंटंट्स च्या संमेलनांचे आयोजन करणे तसेच कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यावर आयकर विभागाने अधिक भर दिला पाहिजे. कर रचनेत कालसुसंगत सुधारणा करणेही आवश्यक असते. याबरोबरच करचुकवेगिरीला आळा घातला पाहिजे.

जर्मनीचा दाखला देत ते म्हणाले की, तेथे नियमित आयकर भरणाऱ्यांना सन्मान मिळतो, ओळखपत्र मिळते. अशा प्रोत्साहनात्मक उपक्रमांचा अंगिकार करावा. ज्यांचे मुख्य उत्पन्न शेती नसून इतर व्यवसाय आहे, त्यांनी केवळ नावापुरती शेती दाखवून कर टाळू नये. यासाठी पारदर्शक आणि तर्कशुद्ध निकषांची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी, असेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी कौटिल्य (चाणक्य) यांच्या पुतळ्याचे अनावरण केले. तसेच, सर्वाधिक कर भरलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया, टाटा सन्स प्रा. लि., एचडीएफसी बँक लि. आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन तसेच सेवनिवृत्त अधिकारी आणि आयकर विभागाचे उत्कृष्ट खेळाडूंना राज्यपालांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलाकार सन्मान योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

वृत्तसंस्था/मुंबई

राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलाकार सन्मान योजनेंतर्गत कला व साहित्य क्षेत्रात दीर्घकाळ योगदान देणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा पाच हजार रुपये इतके मानधन दिले जाणार आहे. या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी ३१ जुलैपर्यंत 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करावा, असे आवाहन मुंबई शहरचे निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. शिवनंदा लंगडापूरे यांनी केले आहे.



या योजनेसाठी लाभार्थ्यांचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक असावे. तसेच दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादा ४० वर्षे करण्यात आली आहे. कला व साहित्य क्षेत्रात किमान १५ वर्षांचे योगदान आवश्यक असून वयोमानानुसार ज्येष्ठ असणारे विधवा, परितक्त्या व दिव्यांग कलाकारांना प्राधान्य दिले जाईल. त्याचप्रमाणे कलाकारांचे वार्षिक उत्पन्न ६०,००० रुपयांपेक्षा अधिक नसावे. ज्या कलाकारांची उपजीविका पूर्णतः कलेवर अवलंबून आहे, व इतर कोणताही उत्पन्नाचा स्रोत नाही, असे कलाकार पात्र ठरतील. केंद्र व राज्य शासनाच्या कोणत्याही महामंडळ किंवा नियमित मासिक पेन्शन योजनेत लाभार्थी असता कामा नये तसेच कलाकार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जासोबत वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, पती-पत्नीचा एकत्र फोटो (लागू असल्यास), बँक पासबुक, अपंगत्वाचा दाखला (लागू असल्यास), राज्य व केंद्र सरकारची प्रमाणपत्रे (लागू असल्यास) आणि नामांकित संस्था/व्यक्ती यांचे शिफारसपत्र (लागू असल्यास) ही आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242